दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष – ५ वे अंक –३५१ रविवार,दि.२४ ऑगस्ट २०२५ 98 22 62 85 21 आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-351 Sunday, Dt.24 August 2025 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

# सरकारची ‘उपसमिती’ म्हणजे ‘जुनेच खूळ’

## मनोज जरांगेंचा संतप्त सवाल

वडीगोद्री : प्रतिनिधी

मराठा आरक्षणासंदर्भात सरकारने नेमलेल्या उपसमितीवरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरकारने मराठा समाजाला ‘येड्यात काढू नये’, असे सुनावत, ही समिती म्हणजे ‘जुनेच खूळ’ असून ‘फक्त खांदे बदलले पोळ्याच्या दिवशी’, असा टोला त्यांनी लगावला आहे.

अंतरवाली सराटी येथे माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी सरकारवर सडकून टीका केली. ‘आमचं म्हणणं सरकारच्या डोक्यात येत नाही, सरकार किडे पडल्यासारखं वागायला लागलं आहे,’ असा संताप त्यांनी व्यक्त केला.



### उपसमिती जुनीच

जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले की, उपसमिती स्थापन करणे आणि त्यांच्या मागण्यांची अंमलबजावणी करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. ‘उपसमिती तर पूर्वीच होती, फक्त आता दुसरे कोणीतरी अध्यक्ष झाले आहे, याला आमच्याकडे खांदे बदल म्हणतात’ असे म्हणत त्यांनी सरकारची कृती निव्वळ पोकळ असल्याचे सांगितले.

जरांगे यांच्या मागण्या

– मराठा–कुणबी एक आहेत, असा जीआर काढावा.

– यासाठी तातडीने कॅबिनेट बैठका घ्या.

– केसेस मागे घ्या आणि शहीद झालेल्या कुटुंबांना मदत द्या.

– ‘सगेसोयरे’ अधिसूचनेची अंमलबजावणी करा.

– हैदराबाद व सातारा संस्थानांच्या गॅझेटसाठी मंत्रिमंडळाची बैठक बोलवा.

मुंबईकडे मोर्चा काढण्याचा इशारा

सरकारने जर आमच्या मागण्यांची अंमलबजावणी केली नाही, तर आम्ही मुंबईला येऊ, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. ‘तुम्ही दिशाभूल करणारे काम करू नका, मराठ्यांना येड्यात काढायचे बंद करा,’असेही त्यांनी ठणकावून सांगितले.

# राक्षसभुवनच्या शनी मंदिराचा पहिला मजला पाण्याखाली, उपमूर्तींचे दर्शन

## जायकवाडीतील विसर्गाचा परिणाम, दुसऱ्या मजल्यावर दर्शनाची सोय

बीड /प्रतिनिधी

पांचाळेश्वर मंदिरही गेले पाण्याखाली, गोदावरी दुथडी जायकवाडीतून होत असलेल्या विसर्गामुळे शनीच्या साडेतीन पिठांपैकी पूर्णपीठ असलेल्या गेवराई तालुक्यातील राक्षसभूवन येथील शनी मंदिर पाण्याखाली गेले आहे. गुरुवारी रात्री शनी मंदिरात गोदावरीचे पाणी येण्यास सुरुवात झाली होती. शुक्रवारी सकाळपर्यंत शनीदेवाची मूर्ती असलेला पहिला मजला पूर्णत: पाण्याखाली गेला. आज शनी अमावस्या आहे.मात्र, शनीमूर्तीच पाण्याखाली गेल्याने दुसऱ्या मजल्यावर असलेल्या उपमूर्तीचे दर्शन भाविकांना घ्यावे लागणार आहे. तर महानुभव पंथाचे पांचाळेश्वर येथील दत्तमंदिरही पाण्याखाली गेले आहे.



जायकवाडी धरणात पाणीसाठा ९६ टक्के झाल्याने आणि धरणात पाण्याची आवक ४३ हजार ४४२ क्यूसेक वेगाने सुरुच असल्याने पाणी पातळी नियंत्रीत ठेवण्यासाठी गुरुवारपासून जायकवाडीचे १८ दरवाजे सुमारे अडीच फुटाने उघडून गोदावरी पात्रात पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. गुरुवारी एकूण ४७ हजार १६० क्सूसेक विसर्ग करण्यात आला होता . दरम्यान, सध्या पवित्र श्रावण महिना संपत आला आहे. त्यातच शुक्रवार व शनीवार अशा दोन अमावस्या आहेत. शुक्रवारी सकाळी साडेअकरा सुरु झालेली अमावस्या शनीवारी सकाळी साडेअकरा वाजेपर्यंत आहे. श्रावण महिना, शनीवार व अमावस्या असा योग येत असल्याने व पूर्णपीठ असल्याने परराज्यातूनही भाविक दर्शनासाठी गर्दी करत असतात. मात्र मंदिर व मूर्ती पाण्याखाली गेल्याने दुसऱ्या मजल्यावर उपमूर्तीचे दर्शन घेण्याची व्यवस्था केली गेली होती. आजही याच मूर्तीचे दर्शन घ्यावे लागेल. शनी अमावस्येला शनी मंदिरातील मूर्ती गोदावरीच्या पाण्याखाली जाण्याची सात वर्षातील ही दुसरी वेळ आहे. जेंव्हा गोदावरीला पूर येतो तेंव्हा अशी स्थिती निर्माण होते. पर्यायी व्यवस्था म्हणून उपमूर्ती दुसऱ्या मजल्यावर ठेवण्यात आलेली आहे. ३० हजार भाविक येणार : शुक्रवारीही दिवसभरात सुमारे १० हजार भाविकांनी दर्शन घेतले. आज शनिवारी पहाटेपासून भाविक दर्शनाला येतील. सुमारे ३० हजार भाविक आज दर्शन घेतील अशी शक्यता आहे. त्या अनुषंगाने पोलिस प्रशासनाला सोबत घेऊन मंदिर समितीने व्यवस्था केली आहे.

# मांजरसुंबातून जरांगे पाटील सरकारला काय इशारा देणार



### आज जरांगे पाटलाच्या उपस्थितीत मांजरसुंबा चौकात मराठा समाजाची इशारा बैठक

बीड ।प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह समाज बांधव दि. २७ ऑगस्ट रोजी मुंबईकडे कूच करणार आहेत. दि.२९ ऑगस्टला मुंबईत दाखल होण्याच्या अनुषंगाने मराठा समाज बांधवांकडून जोरदार तयारी सुरू आहे. दरम्यान मुंबईला निघण्यापुर्वी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आज रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी मांजरसुंबा तालुका बीड येथील चौकात अंतीम निर्णायक बैठक घेण्यात येणार आहे.

बैठकीची तयारी पूर्ण झाली असून बैठकीचे नाव इशारा बैठक असेल. २९ ऑगस्टच्या आंदोलनाच्या दृष्टीने ही तयारी

(उर्वरीत पान २ वर)

# माऊली गुरुराज माऊलीच्या जयघोषात भव्य शोभायात्रा संपन्न

### मन्मथ स्वामी म्हणजे श्रद्धा, विश्वास व सेवेचे फळ देणारी माऊली– सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर

बीड ।प्रतिनिधी

श्री क्षेत्र पावन भूमी कपिलधार हे महान संत शिरोमणी व भक्तांची इच्छा व अपेक्षा पूर्ण करणारी माऊली म्हणजे मन्मथ स्वामी महाराज हे आहेत. असे उद्गार शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी ४१ व्या अनुष्ठानाच्या सांगता प्रसंगी आपले विचार व्यक्त केले.



सदुरु शिवानंद शिवाचार्य तमलूरकर महाराज यांचे ४१ अनुष्ठान दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले या अनुष्ठान सांगता प्रसंगी मनोगत व्यक्त केले, यावेळी भक्तगणांनी महाराजांची भव्य दिव्य अश्वारूढ शोभायात्रा काढण्यात आली होती.या शोभा यात्रेमध्ये महिलांनी फुगड्यांचा आनंद घेतला ,याबरोबरच मन्मथ स्वामी महाराजांच्या नामाचा गजर करत श्री मन्मथ मुक्तिधाम मठापासून मन्मथ स्वामी मंदिरापर्यंत ही सवाद्य मिरवणूक आल्यानंतर श्री मन्मथ स्वामी समाधी दर्शन घेऊन

(उर्वरीत पान २ वर)

# जगन्नाथ सोनवणे व शशिकांत भोकरे यांचा आज सेवापुर्ती गौरव सोहळा

आष्टी ।प्रतिनिधी

नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे मांडवा शाळेचे आदर्श मुख्याध्यापक श्री. जगन्नाथ सोनवणे व आदर्श सहशिक्षक श्री. शशिकांत भोकरे हे दोघेही ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त श्री. जगन्नाथ राघोबा सोनवणे (राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक जि. प. प्रा. शा. मांडवा) व श्री. शशिकांत



आदिनाथ भोकरे (सहशिक्षक जि. प. प्रा. शा. मांडवा) यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा आज रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, गणपती चौक, आष्टी, जि. बीड येथे आयोजित केला आहे. या सोहळयाला शिक्षण प्रेमी नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

तरी या सेवापुर्ती गौरव सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून आ. सुरेश आण्णा धस (आमदार आष्टी, पाटोदा, शिरूर) हे उपस्थित राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब, मा. आ. साहेबराव दरेकर नाना, मा. आ. बाळासाहेब आजबे काका, विजयकुमार गोल्हार (भाजपा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य), सौ. सविताताई

(उर्वरीत पान २ वर)

हे नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त यांचा
सेवापुर्ती गौरव सोहळा
रविवार दिनांक २४/०८/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा. आयोजित केला आहे. तरी या कार्यक्रमाचे
श्री.जगन्नाथ राघोबा सोनवणे
राज्य पुरस्कार प्राप्त मुख्याध्यापक जि.प.प्रा.शा. मांडवा
श्री.शशिकांत आदिनाथ भोकरे
सहशिक्षक जि.प.प्रा.शा. मांडवा
* प्रमुख अतिथी *
मा.आमदार सुरेश (आण्णा) धस
(आमदार आष्टी,पाटोदा,शिरूर)
* प्रमुख पाहुणे *
मा.आ. भीमरावजी धोंडे साहेब (माजी आमदार)
मा.आ. साहेबराव दरेकर (नाना) (माजी आमदार)
मा.आ. बाळासाहेब आजबे (काका) (माजी आमदार)
मा.श्री. विजयकुमार गोल्हार (भाजपा महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य)
मा.सौ. सविताताई गोल्हार (माजी जि.प. अध्यक्षा, बीड)
मा.श्री. देविदास (आबा) धस (माजी जि.प.सदस्य, बीड)
मा.श्री.किशोर (नाना) हंबर्डे (अध्यक्ष,आष्टी शिक्षण प्रसारक मंडळ)
मा.श्री. रावसाहेब (आबा) लोखंडे (मा. पं.स. सदस्य, आष्टी)
* प्रमुख उपस्थिती *
मा.श्री. गोकुळ बागलाने साहेब (प्रशासक तथा गटविकास अधिकारी पं.स. आष्टी)
मा.श्रीम. सिमा काळे मॅडम (गटशिक्षण अधिकारी, आष्टी)
मा.श्री. प्रशांत शिंदे (गटशिक्षणाधिकारी, शिरूर का.)
मा.श्री. विक्रम पोकळे साहेब (मा. शिक्षणाधिकारी, बीड)
मा.श्री. सुरेश पवार साहेब (मा.शिक्षण विस्तार अधिकारी, आष्टी)
मा.श्री. मारुती पठाडे (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था,कडा)
मा.श्री. महेशकुमार शिंदे (सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा)
मा.श्री. मनोरंजन धस साहेब (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी,बीड)
मा.श्री. धनंजय बोदार्डे साहेब (गट शिक्षण अधिकारी, पाटोदा)
मा.श्री. मोहन काकडे साहेब (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, आष्टी)
मा.श्री. अर्जुन गुंड साहेब (मा.शिक्षण विस्तार अधिकारी आष्टी)
मा.श्री. मोहन जगताप (मा.सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था,कडा)
मा.श्री. अशोक लटपटे (उपाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था,कडा)
सर्व संचालक मंडळ स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था, कडा
* आपले विनीत *
श्री. रघुनाथ खंडागळे (कें.प्र. तथा कें. मुख्याध्यापक बेलगांव)
सर्व घटकशाळा मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद केंद्र, बेलगांव, ता. आष्टी, जि.बीड
सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य व समस्त ग्रामस्थ मांडवा, ता. आष्टी, जि.बीड
स्थळ : मोरेश्वर मंगल कार्यालय, गणपती चौक, आष्टी, जि.बीड

जाहिरातदारांना विनम्र आवाहन...!
दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५
स.न.वि.वि.
मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील ‘दै.समर्थ राजयोग’ चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही ‘वर्धापन दिन विशेषांक २०२५’ चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.
जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर 9822628521
दै.समर्थ राजयोग
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303
जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम |
| --- | --- | --- | --- |
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/– |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/– |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/– |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/– |

₹5000/– ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!
जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वाचकांना विनम्र आवाहन...!
दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५
रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत
दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 6 वा वर्धापन दिन होत आहे. या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.
आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया तात्काळ व्हाट्सअप नंबर 98 22 62 85 21 यावर आपल्या पासपोर्ट फोटोसह पाठवावी...ही विनम्र विनंती...
आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

सस्नेह निमंत्रण
दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
6 वा वर्धापन दिन..!
शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा 6 वा वर्धापन दिन आहे.
या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात.
शुक्रवार, दिनांक 5 सप्टेंबर 2025
वेळ - सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत....
स्थळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड
टीप - स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य आणावे. आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल... धन्यवाद...
आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521

# संपादकीय

## लोकशाहीचे आखाडे

सुमारे पाच आठवडे चाललेलं संसदेचं अधिवेशन परवा संस्थगित झालं. दिनदर्शिकेनुसार दिवस मोजले, तर ते साधारण पाच आठवडे होतात. पण, संसदेच्या काय किंवा विधिमंडळाच्या काय, कुठल्याच अधिवेशनाचा तो खरा कालावधी नसतो. प्रत्येक आठवड्यात अधिवेशनाला शनिवारी-रविवारी साप्ताहिक सुट्टी असतेच. शिवाय, अधिवेशनाच्या नियोजित कालावधी अंतर्गत येणाऱ्या नैमित्तिक सुट्ट्याही असतातच. त्यामुळे, 'अमुक एक आठवड्यांचं अधिवेशन' म्हटलं, तरी प्रत्यक्षात कामकाजाचे दिवसच मोजायचे असतात. त्यात पुन्हा सभागृहात वातावरण तापलं, की होणारी तात्पुरती, वारंवार किंवा दिवसभरासाठी तहकुबी असतेच. तोही काळ अधिवेशनाच्या नियोजित कालावधीतून वजा करावा लागतो. त्यामुळे, कोणतंही अधिवेशन 'किती कालावधीचं?' याचं उत्तर नेहमी दिवसांच्या हिशेबातच दिलं जात असलं, तरी 'अधिवेशन, म्हणजे कामकाज नेमकं किती काळ चाललं!' याचं उत्तर हल्ली तासांच्या हिशेबातच द्यावं लागतं. त्याअर्थाने नुकत्याच संपलेल्या अधिवेशनात राज्यसभेचं कामकाज एकूण ४१ तास, तर लोकसभेचं केवळ ३७ तास चाललं. हे आकडे फारच कमी दिसतात म्हणून की काय, पण अधिवेशनाची गोळाबेरीज सांगताना दोन्ही सभागृहांच्या कामकाजाच्या कालावधीची बेरीज करून 'अधिवेशनाचं कामकाज ७८ तास चाललं' असं सांगितलं गेलं आहे. टक्केवारी पाहायला गेलो, तर नियोजित कामकाजापेक्षा लोकसभेत फक्त ३१ टक्के आणि राज्यसभेत ३९ टक्केच कामकाज होऊ शकलं आहे! अधिवेशनाचं कामकाज ठरवताना सरकारने जी विषयपत्रिका ठरवली होती, जी विधेयकं मांडण्याचं ठरवलं होतं, अन्य सरकारी कामकाज ठरवलं होतं, त्यातलं बहुशः झालं. पण, त्यात लोकप्रतिनिधींचा सहभाग किती होता? असा प्रश्न विचारला, तर त्याचं उत्तर मात्र अत्यंत निराशाजनक आहे.

संसदेच्या अधिवेशनासाठी सरकारी तिजोरीतून; म्हणजेच जनतेच्या खिशातून दर मिनिटासाठी अडीच लाख रुपये खर्च केला जातो. हा खर्च किती प्रमाणात आणि कशासाठी वाया जातो आहे, हे पाहिलं की लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराला कशाचं रूप आलं आहे? असा प्रश्न आल्याशिवाय राहत नाही. अधिवेशनाचं कामकाज वेळेच्या दृष्टीने फारसं समाधानकारक झालं नसलं, तरी विषय आणि घडामोडी पाहता अधिवेशनाने सामान्य जनतेचं लक्ष खिळवून ठेवलं होतं, हे नक्की. 'ऑपरेशन सिंदूर'वरची चर्चा अधिवेशनाच्या अगदी सुरुवातीलाच ठेवून सरकारने बाजी मारली होतीच. या चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी स्वतः लोकसभेत उत्तर देणार हे निश्चित झाल्याने चर्चेचा परिणाम जनतेत सकारात्मकच जाणार हे सुनिश्चित होतं. झालंही तसंच. लोकसभेत ७३, तर राज्यसभेत ६५ सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांना मोदी आणि राज्यसभेत अमित शहा यांनी इतकं समर्पक आणि प्रभावी उत्तर दिलं, की त्यामुळे विरोधकांना आपलं अस्तित्व दाखवण्यासाठी अन्य हत्यार उपसावं लागणार हे पहिल्या आठवड्यातच स्पष्ट झालं होतं. राहुल गांधी यांचा 'मतचोरी'चा मुद्दा सभागृह आणि सभागृहाबाहेर त्यामुळेच विरोधकांनी अखेरपर्यंत धरून ठेवला. बिहारची निवडणूक आता हातातोंडाशी आली आहे. हिंदी पट्ट्यातलं हे महत्त्वाचं राज्य त्यामुळे सध्या सत्ताधारी आणि विरोधकांची रणभूमी आहे. तिथल्या मतदार याद्यांचा मुद्दा घेऊन; त्याला महाराष्ट्रासह अन्य राज्यातील आरोपांची जुनीच फोडणी देऊन विरोधकांनी संपूर्ण अधिवेशनात हंगामा केला. त्याचं टोक अधिवेशनाच्या शेवटच्या दोन दिवसांत गाठलं गेलं. शाह लोकसभेत जेव्हां 'संविधान (१३०वी) दुरुस्ती विधेयक २०२५', 'संघराज्य शासन (दुरुस्ती) विधेयक २०२५' आणि 'जम्मू-काश्मीर पुनर्रचना (दुरुस्ती) विधेयक २०२५' ही तीन अत्यंत महत्त्वाची विधेयकं मांडत होते,

# बीड येथे ४४ व्या राज्यस्तरीय योग स्पर्धेचे उद्घाटन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २३ ऑगस्ट पासून बीड येथील माँ वैष्णो पॅलेस मध्ये आज दिनांक २३ ऑगस्ट पासून सुरू झालेल्या ४४ व्या महाराष्ट्र योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशीप बीड २०२५ या स्पर्धेचे भव्य उद्घाटन आज दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले.

योगा फेडरेशन ऑफ इंडिया यांना संलग्न असलेल्या महाराष्ट्र योग असोसिएशन यांच्या वतीने बीड येथे ४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशिप स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे . बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशन व महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीड यांना या स्पर्धेचे यजमानपद दिलेले आहे.आज दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी माँ वैष्णो पॅलेस एमआयडीसी पेठ बीड या ठिकाणी या स्पर्धेचे भव्य उद्घाटन संपन्न झाले.या उद्घाटन सोहळ्यासाठी प्रमुख अतिथी म्हणून दैनिक पार्श्वभूमीचे संपादक गंमत भाऊ भंडारी यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महामंत्री, या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी हे व्यासपीठावर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्यासाठी फर्टीलायझर्स असोसिएशन बीडचे अध्यक्ष अंगदजी नवले,व्यापारी महासंघाचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष विनोद पिंगळे, राजस्थानी सेवा समाज संस्थेचे अध्यक्ष विष्णूदास तापडिया, राजस्थानी सेवा समाज संस्थेचे सचिव रामेश्वर कासट, दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी,महाराष्ट्र योग असोसिएशनचे चेअरमन तथा भारतीय योग संघाचे प्रशिक्षक व कर्णधार चंद्रकांत पांगारे व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी महाराष्ट्र योग असोसिएशनच्या अध्यक्ष डॉ. अनिता पाटील, सेक्रेटरी जतीन सोळंके, कोषाध्यक्ष श्रीमती अनिता गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमासाठी शिक्षण विस्तार



अधिकारी तुकाराम जाधव, आयोजन समितीचे कार्याध्यक्ष सचिन ढेपे कार्याध्यक्ष प्रदीप दादा क्षीरसागर, नगरसेवक ,सतीश आप्पा पवार ,रोटरी क्लब ऑफ बीड मिडटाउनचे अध्यक्ष राहुल बोरा ,बीड जिल्हा पतंजली योग समितीचे अध्यक्ष नितीन गोपन, मा.नगरसेवक किशोर काळे, बीड शहरातील मोजकर ग्रुपचे संस्थापक, प्रसिद्ध उद्योगपती प्रवीण मौजकर, बीड जिल्हा मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस रामचंद्र ठोसर, पतंजली योग समितीचे बीड तालुका प्रभारी विलास घोडके ,राजस्थानी सेवा समाज संस्थेचे संचालक अशोक मंत्री, छत्रपती शिवाजी महाराज शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक शिवनाथ म्हेत्रे , प्रसिद्ध व्यापारी रामप्रसादजी बियाणी व्यासपीठावर उपस्थित होते.बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे अध्यक्ष विनायकराव वझे ,महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीडचे अध्यक्ष विकास गवते व्यासपीठावर उपस्थित होते.या उद्घाटन पर सोहळ्यामध्ये सर्वप्रथम दीप प्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.त्यानंतर राज्यस्तरीय योगा स्पोर्ट चंपियनशिप बीड २०२५ च्या आयोजन समितीच्या वतीने सर्व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रम नंतर पुणे येथील नारायणी योगा अँड फिटनेस गुरुकुल चे योग खेळाडू व पुणे डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू यांनी देशभक्तीपर गीता वर सुंदर असा कलात्मक योग डेमो डान्स या कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यासमोर सादर केला आणि पाहुण्यांची मन जिंकली सर्व उपस्थित पाहुण्यांनी या खेळाडूंचे कौतुक केले.आज सकाळी नऊ वाजल्यापासून बीड शहरातील माँ वैष्णो पॅलेस या कार्यालयामध्ये ही स्पर्धा सुरू आहे. आज सायंकाळी ९ वाजेपर्यंत ही स्पर्धा सुरू असून महाराष्ट्र राज्यातील जवळपास २१ जिल्ह्यातील खेळाडू या स्पर्धेसाठी बीड शहरामध्ये दाखल झालेले आहेत. ३०० योग खेळाडू वेगवेगळी स्पर्धात्मक आसने या ठिकाणी सादर करणार असून आलेल्या खेळाडू मधून मैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा कॉम्पिटिशन साठी महाराष्ट्र राज्याच्या संघाची निवड केली जाणार आहे. उद्या सकाळी २५ ऑगस्ट २०२५ रोजी नऊ ते एक वेळेमध्ये राहिलेली उर्वरित स्पर्धा संपन्न होईल. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत दुपारी तीन ते पाच या वेळेत या स्पर्धेचे बक्षीस वितरण होणार आहे . बक्षीस वितरण कार्यक्रमांमध्ये सुंदर अशा योगा डेमोचे सादरीकरण केले जाणार आहे. तसेच मैसूर येथे होणाऱ्या ५० व्या राष्ट्रीय योगा कॉम्पिटिशन साठी महाराष्ट्र राज्याची निवड घोषित केली जाणार आहे. तरी सर्व बीड वासीयांनी उद्या रविवारी सकाळी नऊ ते पाच या वेळेमध्ये माँ वैष्णो पॅलेस कार्यालयामध्ये सुरू असलेल्या स्पर्धेचा लाभ घ्यावा असे आवाहन स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी यांनी केले आहे.

# निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे परळीतील प्रभाग रचना करा - बालाजी जगतकर

बीड ।प्रतिनिधी

परळी शहरातील सर्वच मागासवर्गीय वस्त्यांची विभाजन करून जुनी प्रभावी रचना केली आहे. ती बदलून नवीन प्रभाग रचना करा त्यामध्ये प्रामुख्याने भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, रोडे गल्ली ताटे गल्ली आरोग्य गल्ली, रमानगर, या वस्ती आहे अनुसूचित जातीच्या आहेत. त्या भागाचे विभाजन टाळून अनुसूचित जातीच्या प्रभागात समावेश करावा यासाठी जवळपास १०० पेक्षा जास्त मतदारांनी व या भागात राहणाऱ्या लोकांनी हरकती, आक्षेप नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे नोंद करायला सुरुवात केली आहे. व आक्षेपी व हरकती नोंद सुरूच आहेत ३१ ऑगस्ट पर्यंत त्या नोंदवल्या जाणार आहेत.



या अगोदर देखील दि. १९/६/२०२५ या तारखेला निवेदन दिलेली आहे. अनुसूचित जाती या समाजाचा असल्यामुळे दलित वस्ती व इतर योजनेपासून वंचित ठेवत आहात प्रभाग क्रमांक पाच (५) गणेशपार, कालरात्री देवी मंदिर परिसर, यात आपण जगतकर गल्ली, गणेश पारपरिसर, काळाराम मंदिर परिसर, व आंबेवेस या प्रभागात अनुसूचितजाती लोकसंख्या ६५७, अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०६, व प्रभाग क्रमांक १६ या प्रभागात आपण अनुसूचित जाती लोकसंख्या ५७७, अनुसूचित जमाती ७६ लोखसंख्या आहे. या दोन प्रभागाची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकत्र केल्यास १२०० आहे तेव्हा या निवेदनावर माझा असा आरोप आहे की आपण प्रभाग क्रमांक ५. प्रभाग क्रमांक ६ या दोन्ही प्रभागाचे मते विभागून आपण कोणा तरी राजकीय पक्षाला मदत करत आहात. आपणास पुनश्च विनंती आहे की निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे म्हणजे वार्डाची लोकसंख्या ही अध्यांपेक्षा जास्त अनुसूचित जातीची असावी, व ५.५.३ प्रभाग रचना मार्गदर्शन तत्त्व ५.५.३ व अनुसूचित जाती ऑब्लिक अनुसूचित जमाती यांच्या वस्तीचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी मुंबई यांनी दिलेले असतानाही परळी नगरपालिका प्रशासन, परळी निवडणूक अधिकारी व प्रस्थापित राजकीय नेते आमदार, खासदार यांच्या सांगण्यावरून त्यांचे त्यांच्या सोयीप्रमाणे प्रभाग रचना करत आहेत व केली आहे. यामुळे राजकीय अन्याय तर होतच आहे पण आमच्या अधिकाऱ्यापासून आम्हास वंचित ठेवत आहात. नगरपालिका प्रशासन व प्रस्थापित राजकीय नेते यांनी संगणमत करून जाणीवपूर्वक अशी प्रभाग रचना केली आहे. अनुसूचित जातीच्या वाडांचे विभाजन प्रभाग क्रमांक ०४ प्रभाग क्रमांक ०५ प्रभाग क्रमांक १६ यातील प्रभाग रचनेत केलेले आहे. तेव्हा सदरील प्रभाग रचना पुन्हा करून अनुसूचित जाती व जमातीचा प्रभाग एक करावा अन्यथा आपल्या विरोधात आम्हाला कायदेशीर व सनदशीर मागने न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत. न्याय न मिळाल्यास कायदेशीर लढाई देखील लढली जाणार आहे.

संबंधिता विभागाच्या दोषींवर कारवाई करण्यात येऊ नये का ?

निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याच्या दोन महिने अगोदर संबंधिताला निर्णय प्रक्रियेतील अधिकाऱ्यांना लेखी स्वरुपात २०० लोकांच्या तक्रार व निवेदन देऊनही कुठलीच कारवाई न केल्याच्या बद्दल संबंधिता विभागाच्या अधिकाऱ्यावर व कर्मचाऱ्यावर कारवाई करण्यात येऊ नये का ? अशा प्रकारे नोटीस ही बजावणार आहेत अशी माहिती किंवा चर्चा येथील मतदारातून होताना दिसत आहे.

# साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा

## पुनंदगाव नागझरी नांदूर ग्रामस्थांनी एकत्र येऊन राबवला अविस्मरणीय उपक्रम

माजलगाव ।प्रतिनिधी

जिथे एक गाव एक जयंती उत्सव साजरा होत नाही तिथे पुनंदगाव येथील साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव कमिटीने जयंती उत्सवाच्या कार्यक्रमासाठी तीन गाव जोडून एक आदर्श निर्माण करून इतिहास घडवला आहे. दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी हा सोहळा मोठ्या थाटामाटात पुनंदगाव येथे संपन्न झाला.सकाळी १० वाजता ध्वजारोहण संपन्न झाले.दुपारी सरपंच रुद्रा कूरे यांनी मिरवणूकीचे उद्घाटन केले तर मोठ्या थाटामाटात मिरवणूक संपन्न झाली व अगदी उत्साहात तिनही गावात या मिरवणूकीचा रंग पाहायला मिळाला विशेष म्हणजे या तीनही गावासह परिसरातील सर्व मंडळींसाठी स्नेहभोजन या कमिटीने आयोजित केले होते.नियोजित वेळेत याच भागातील राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विविध पारितोषिक मिळवलेल्या संध्या अंकुश मुजमुले,समृद्धी सतिश काकडे,साक्षी संतोष शिंदे या बालकलाकारांनी आपल्या नृत्याने उपस्थितांचे मन



जिंकली.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नितीन नाईकनवरे तर उद्घाटक म्हणून विजय जगताप हे होते.प्रमुख पाहुणे लहुजी विद्रोही सेनेचे अध्यक्ष भास्कर शिंदे,महाराष्ट्र आधार सेनेचे अध्यक्ष तथा दैनिक महाराष्ट्र आरंभचे संपादक दिपक थोरात,अमोल शेरकर,अनिल राधे कांबळे, चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके,डॉ.यशवंतराजे भोसले, एड.अमोल डोंगरे, डॉ.पूजा केंद्रे,भिसे सर,परमेश्वर आडागळे,पत्रकार अमर साळवे,मच्छिंद्र उफाडे,परमेश्वर चांदने हे होते.मान्यवरांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले.तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश काकडे यांनी केले. आभार पत्रकार आनंत घडसिंगे यांनी मानले.

मान्यवरांच्या मनोगतानंतर कार्यक्रमानंतर कलर्स मराठी फेम शुभम मस्के यांचा बहारदार गीताचा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे,डॉ.गिलबिले,डॉ.दिनकर मस्के,डॉ.अमोल परतुरकर, डॉ.गणेश सुरवसे यांनी या कार्यक्रमास धावती भेट दिली.या कार्यक्रमास परिसरातील प्रेक्षणीय उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे आयोजन पुनंदगाव, नागझरी,नांदूर साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे जन्मोत्सव समितीने केले होते.

## पान १ वरून...

### मांजरसुंबातून जरांगे पाटील...

करण्यात येत आहे. या बैठकीतून मनोज जरांगे पाटील सरकारला काय इशारा देतात ? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मांजरसुंबा येथे आज होणाऱ्या बैठकीसाठी जिल्हाभरातील सर्व मराठा सेवक, समाज बांधव मोठ्या सख्येने उपस्थित राहणार आहेत. मुंबईला निघण्यापुर्वी होणाऱ्या बैठकीत जरांगे पाटील समाजाला काय आवाहन करतात ? मुंबईतील आंदोलनाच्या पाश्र्वभुमीवर राज्य सरकारने मंत्र्यांची उपसमिती गठीत केली आहे. याबाबत जरांगे पाटील काय बोलतात ? याकडेही राज्याचे लक्ष लागलेले आहे..

### सौ.पुनमताई पवार लंडन येथे ...

आले. जिल्हा परिषदेची पहिली निवडणूक लढवताना त्या महाराष्ट्र राज्यातून दुसऱ्या क्रमांकाच्या विक्रमी मताधिक्याने विजयी होत विरोधकांच्या उरात कायमची धडकी भरवली होती. एक आमदार दोन कामदार ही भूमिका आपल्या पतीसोबत खांद्याला खांदा लावून निभावत त्यांनी अनेक समाज उपयोगी उपक्रम आपल्या जिल्हा परिषद सर्कल तथा नायगाव विधानसभा मतदारसंघात राबवले.

त्यांच्या दूरदृष्टी संकल्पनेतून नायगाव विधानसभा मतदारसंघात तब्बल ५० हजारांच्या वर लोकांच्या डोळ्यांची तपासणी करून मोफत चष्मे वाटप करण्यात आले. ओवाळीते भाऊराया या कार्यक्रमाद्वारे आपल्या मतदार संघातील सगळ्या भावांना १५हजार राख्या पाठवून त्यांनी एक विश्वविक्रमच केला. विद्यार्थ्यांसाठी त्या प्रेरणास्पद आईप्रमाणे सुरक्षा कवच ठरल्या असून आपल्या मतदारसंघात तब्बल ७५ हजारांच्या वर छत्र्याचे वाटप त्यांनी करीत हा पण एक विश्वविक्रम केला. आज घडीला नायगाव विधानसभा मतदारसंघातील तीनही तालुक्यातील प्रत्येक गावात पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे फक्त त्यांच्याच छत्र्या सर्व रस्त्यावर दिसत आहेत. नवजात प्रसुती मातांसाठी हजारो किटचे वाटप त्यांनी करत माता व बालसंगोपनाला आपल्या मतदारसंघात अनन्यसाधारण महत्त्व दिले. स्वतः इंजिनीयरची पदवी घेतलेल्या सौ.पुनमताई पवार यांची राजकीय दूरदृष्टी पण तेवढीच महत्त्वाची ठरते!

त्यांच्या उपरोक्त सर्व उपक्रमाने आमदार राजेश पवार यांच्या विजयात त्यांचा सिंहाचा वाटा ठरलेला आहे. त्यांच्या स्तुत्य उपक्रमाची यशोगाथा नायगाव मतदारसंघातच नाही तर संपूर्ण महाराष्ट्रात पसरली असल्यामुळे लोकमत समूहाने या गोष्टीची आवर्जून दखल घेत सौ.पुनमताई राजेश पवार यांना लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने गौरवीत केले. त्यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे अख्ख्या नायगाव विधानसभा मतदारसंघात त्यांच्या चाहत्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून त्यांच्यावर कौतुकांचा व अभिनंदनाचा पाऊसच पडत आहे.

### माऊली गुरुराज ....

तमलूरकर महाराजांनी ४१ व्या अनुष्ठान दरम्यान जमलेल्या भाविक भक्तांना अनमोल असे मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की मन्मथ स्वामी हि कृपा करणारी माऊली आहे स्वामींची आपण मनोभावे सेवा केली तर त्याचे फळ निश्चित संत शिरोमणी मन्मथ स्वामी आपणास देतात .या ठिकाणी जमलेल्या चार राज्यातील भक्तगणांच्या असंख्य संख्येवरून असे दिसते की प्रत्यक्ष भगवान मन्मथ स्वामी महाराज यांनी आपल्या भक्त गणावर कृपाशीर्वाद केला आहे व त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण केल्या आहेत, त्यांच्या सेवेचे फळ त्यांना मिळाले त्यामुळेच हा असंख्य जन समुदाय गेल्या एक महिन्यापासून या ठिकाणी आपली सेवा करत आहेत.

गुरुमाऊली हे कल्पवृक्ष...

गुरुमाऊली हे कल्पवृक्षाप्रमाणे आहेत. आपले इच्छित फळ देण्यासाठी ते सदैव भक्तांच्या पाठीशी उभे असतात फक्त आपण मनोभावे त्यांची सर्वांनी सेवा केली पाहिजे. गुरुमाऊलीच्या सानिध्यात येऊन त्यांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे.गुरुच्या आशीर्वाद लाभल्या शिवाय आपल्या जीवनात आनंद, समाधान व यश हे मिळत नाही. गुरुचा कृपा आशीर्वाद मिळाला की आपले जीवन आनंदी होतेच - विश्वनाथ आप्पा स्वामी, मन्मथ स्वामी देवस्थान पुजारी, श्रीक्षेत्र कपिलधार.

### अतिवृष्टीचा मत्स्य ...

संस्थेला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे सदरील संस्थेला नुकसान भरपाई देण्यात यावी असे मागणी संस्थेचे अध्यक्ष अशोक भिवन लुचारे व ईश्वर पाबळे यांनी एका निवेदनाद्वारे केली मागणी आहे. बीड तालुक्यात अनेक वर्षापासून दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड सोसायटी काम करत आहे. या संस्थेच्या माध्यमातून तलावात मत्स्यबीज सोडून माशाचे उत्पादन केले जाते या माशांमुळे अनेकांच्या हाताला काम मिळते. गोरगरीब लोक पोट भरतात तलावातील मासे पकडून ते विक्री केले जातात. या माध्यमातून कुठे रुपयाची उलाढाल होते व गोरगरिबांचा संसार याच व्यवसायाच्या माध्यमातून चालतो, परतु यावर्षी अतिवृष्टीचा फटका या व्यवसायाला बसला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड सोसायटीच्या वतीने बीड तालुक्यातील बिंदुसरा धरण घोडके, राजुरी तलाव व जरूर येथील तलावात मत्स्यबीज सोडण्यात आले होते. या मत्स्य बीजाच्या माध्यमातून मासे तयार होण्याच्या

## पान १ वरून...

अगोदरच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांना ज्याप्रमाणे फटका बसला त्याचप्रमाणे मत्स्य व्यवसायाला ही मोठा फटका बसला आहे मासे मोठे होणे अगोदरच अतिवृष्टीने मत्स्यबीज वाहून गेले आहे. यामुळे सदरील संस्थेला. दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड मोठा फटका बसला असून लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. अनेकांच्या संसाराला हातभार लागणार होता परंतु मत्स्यबीज वाहून गेले आणि त्यांच्या हातात चे काम हिरावून घेतले आहे. त्यामुळे सदरील संस्थेला शासनाने आर्थिक मदत करावी असे मागणी संस्थेचे अध्यक्ष अशोक भिवन लुचारे व ईश्वर पाबळे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

### जगन्नाथ सोनवणे ..

गोल्हार (माजी जि. प. अध्यक्षा, बीड), देविदास आबा धस (माजी जि. प. सदस्य, बीड), किशोर नाना हंबर्डे (अध्यक्ष, आष्टी शिक्षण प्रसारक मंडळ), रावसाहेब आबा लोखंडे (मा. पं. स. सदस्य, आष्टी) यांची उपस्थित लाभणार आहे.

याप्रसंगी प्रमुख उपस्थिती गोकुळ बागलाने साहेब (प्रशासक तथा गटविकास अधिकारी पं. स. आष्टी), मनोरंजन धस साहेब (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, बीड), श्रीम. सिमा काळे मॅडम (गटशिक्षण अधिकारी, आष्टी), धनंजय बोदार्डे साहेब (गट शिक्षण अधिकारी, पाटोदा), प्रशांत शिंदे (गटशिक्षणाधिकारी, शिरूर का.), मोहन काकडे साहेब (जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, आष्टी), विक्रम पोकळे साहेब (मा. शिक्षणाधिकारी, बीड), अर्जुन गुंड साहेब (मा. शिक्षण विस्तार अधिकारी आष्टी), सुरेश पवार साहेब (मा. शिक्षण विस्तार अधिकारी, आष्टी), मोहन जगताप (मा. सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा), मारूती पठाडे (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा), अशोक लटपटे (उपाध्यक्ष, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा), महेशकुमार शिंदे (सचिव, स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्था, कडा) व सर्व संचालक मंडळ स्वामी विवेकानंद शिक्षकांची सहकारी पतसंस्था, कडा यांची असणार आहे.

तरी तालुक्यातील केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षक बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन रघुनाथ खंडागळे (केंद्रप्रमुख तथा केंद्रीय मुख्याध्यापक बेलगांव) व सर्व घटक शाळा मुख्याध्यापक व सर्व शिक्षक वृंद केंद्र, बेलगांव, ता. आष्टी, जि. बीड तसेच सरपंच, उपसरपंच, अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य व समस्त ग्रामस्थ मांडवा, ता. आष्टी, जि. बीड यांनी केले आहे.

# पुलाखाली पाणी वाहतूक ठप्प; ग्रामस्थांचे आंदोलन

बीड /प्रतिनिधी

शहरातील धानोरा रोडवरील रेल्वे पुलाखाली पावसाचे पाणी साचल्याने ग्रामस्थांना वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. ही अडचण दूर करण्याऐवजी रेल्वे प्रशासनाने पुलावरून जाणाऱ्या मार्गावर मुरूम काढण्याचे काम सुरू केल्याने पर्यायी मार्गही बंद झाला. यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी शुक्रवारी दुपारी पुलाजवळ ठिय्या देत तीव्र आंदोलन केले. प्रशासनाच्या मध्यस्थीनंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

आहेर धानोरा, वरवटी, मांडवजाळी, लिंबागणेश या गावांना बीड शहराशी जोडणारा मुख्य मार्ग असलेल्या धानोरा रोड परिसरात रेल्वे स्थानक उभारण्यात आले आहे. काही दिवसांपूर्वी झालेल्या जोरदार पावसामुळे रेल्वे पुलाखालील खोलगट भाग असलेला रस्ता पूर्णतः पाण्याखाली गेला आहे. या मार्गावरून दैनंदिन कामासाठी शहरात येणाऱ्या शेकडो नागरिकांना पर्यायी मार्ग म्हणून पुलावरील रेल्वे रुळाच्या बाजूनेच वाहतूक करावी लागत होती. मात्र रेल्वे प्रशासनाने शुक्रवारी पर्यायी मार्गावरील मुरूम हटवण्याचे काम सुरू केल्याने नागरिकांचा एकमेव उरलेला मार्गही बंद झाला. त्यामुळे वरवंटी आहेर धानोरा ग्रुप ग्रामपंचायतचे उप सरपंच प्रदीप कोटुळे यांच्यासह ग्रामस्थांनी रस्त्यावर उतरून आंदोलन सुरू केले. नायब तहसीलदार व मंडळ अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. प्रशासनाने ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेत रुळावरील मुरूम काढण्याचे काम थांबवण्याचे आदेश दिले.



# सौ.के.एस.के.महाविद्यालयात राष्ट्रीय आंतराळ दिन साजरा

बीड ।प्रतिनिधी

नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय,बीड येथे आज दिनांक २३ ऑगस्ट २०२५ रोजी भौतीकशास्त्र विभाग,विज्ञान मंडळ आणि राष्ट्रीय छात्रसेना यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय आंतराळ दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमास बलभीम महाविद्यालयातील भौतीकशास्त्र विभाग प्रमुख प्रा.बी.टी. ताटे सर हे उपस्थित होते. ताटे सर यांनी आपल्या व्याख्यानात म्हणाले की, भारतीय आंतराळ संस्था आणि आंतरराष्ट्रीय आंतराळ संस्था फार जोमाने कार्य करत आहे. या मध्ये भारताचे जगतील स्थान त्यांनी आधोरेखित केले. भारतीय आंतराळ विषयी त्यांनी पावर पॉईटच्या माध्यमातून अत्यंत सुलभपणे महत्व समजावून सांगीतले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य तथा भौतीकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.शिवानंद क्षीरसागर यांनी सांगीतले की, भारताने जगामध्ये आंतराळ संशोधनात पाचवा क्रमांक निश्चित केला असून संशोधनात भरारी घेतली आहे. चंद्रयान मोहीमेमध्ये भारत देश जगात चौथ्या क्रमांकावर आहे.ही बाब अभिमानास्पद आहे.

यावेळी उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रो.अशोक डोंगरे यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.कॅप्टन बालासाहेब पोटे यांनी तर पाहुण्यांचा परिचय प्रा.शिवाजी राऊत व आभार रूपेश कोकाटे यांनी मानले.यावेळी कॅप्टन अकुलवार, प्रा.कॅप्टन जाधव हे उपस्थित होते. या कार्यक्रमास एनसीसीचे विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

दैनिक
# समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती

बीड (महाराष्ट्र)
BEED (MAHARASHTRA )

रविवार,दि.२४ ऑगस्ट २०२५
SUNDAY, DT.24 AUGUST 2025



## सौ.पुनमताई पवार लंडन येथे महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित !

समाजसेवा हाच आपला जीवन धर्म - सौ.पुनमताई पवार

धर्माबाद / अशोक पडोळे

सद्यस्थितीत अभेद्य अशी राजकीय पार्श्वभूमी असतानाही सत्तेपेक्षा सेवेला एक आई समान प्राधान्य देणाऱ्या, अभियंत्याची अफलातून दूरदृष्टी असलेल्या, तेवढ्याच संवेदनशील हृदयाच्या व समाजसेवाच आपला जीवन धर्म मानत त्या आपल्या कार्याद्वारे सत्यात उतरणाऱ्या आमदार राजेश पवार यांच्या सुविद्य पत्नी, माजी जिल्हा परिषद सदस्या, तथा नांदेड दक्षिणच्या महिला आघाडीच्या




भारतीय जनता पक्षाच्या जिल्हा अध्यक्षा सौ.पुनमताई पवार यांना नुकताच सातासमुद्रापार लंडन येथे लोकमत महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमास लोकमत समूहातील उच्चस्तरीय अधिकारी, सुप्रसिध्द सिने अभिनेता सुनील शेट्टी, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत सदरील पुरस्काराचे वितरण करण्यात

(उर्वरीत पान २ वर)



## अतिवृष्टीचा मत्स्य व्यवसायालाही फटका

बीड ।प्रतिनिधी

तालुक्यातील घोडका राजुरी, जरुड, बिंदुसरा धरण या तलावात दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड मत्स्य को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने मत्स्यबीज टाकण्यात आले होते परंतु अतिवृष्टीमुळे हे अतिवृष्टीने बीज वाहून गेले असून

(उर्वरीत पान २ वर)



बीड - डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना शेख निजाम,शेख नसिर,शेख सत्तार इनामदार,शेख रौफ आदी.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे उत्साहात साजरा

फारुक शेख :-डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगरचा वर्धापन दिन अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे मोठ्या उत्साहात व अभिमानाने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली.यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या निमित्ताने



बोलताना प्राचार्य डॉ. गजहंस यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना, प्राध्यापकांना आणि सर्व कर्मचाऱ्यांना वर्धापन दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच त्यांनी या विद्यापीठाने मराठवाडा विभागाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रगतीत दिलेल्या योगदानाचा गौरवपूर्वक उल्लेख केला.

कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. भुजंगराव डावकर, पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर, कार्यालयीन अधीक्षक श्री. सुरेश चव्हाण तसेच सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीडच्या विद्यार्थ्यांचे यश संपादन

बीड ।प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबईच्या वतीने नुकत्याच घेण्यात आलेल्या उन्हाळी- २०२५ परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यामध्ये मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित,यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन,बीड च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले.**

महाविद्यालयाचा सरासरी निकाल ९५% ईतका लागलेला आहे.त्यामध्ये प्रथम वर्षामधून संगणक विभागातील सातपुते समृद्धी सतीश हिने ९०.९४% प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित यांच्या हस्ते तिचा सत्कार करण्यात आला.तसेच शाखनिहाय बहुसंख्य विद्यार्थी हे विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण झालेले आहेत.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मा.साहेबांनी अभिनंदन केले व पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले, सर्व विभागांचे विभागप्रमुख तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## सौ.के.एस.के.महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा

बीड ।प्रतिनिधी

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात २३ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहन नंतर संगीत विभागाच्या वतीने विद्यापीठ गीत गाऊन विद्यापीठ वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.ए.एस.खान,कमवि उपप्राचार्य एन.आर.काकडे , पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर ,डॉ.भागचंद सानप तसेच एनसीसी कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे व त्यांच्या सर्व कॅडेटनी सहभाग घेतला तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.यादव घोडके,प्रा.जयंत साठे, डॉ.सय्यद इमाद ,डॉ.पल्लवी इरलापल्ले व रासेयोचे सर्व स्वयंसेवक यांच्यासह महाविद्यालयातील सर्व



शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.



दावरवाडी ।प्रतिनिधी

दावरवाडी येथे पोळा सन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला सकाळपासूनच बळीराजाचे मालक शेतकरी बैल यांना सजावट काम सुरू होते आपापल्या बैलाला वेगवेगळी सजावट कोणी पांडुरंगाचे फोटो टाकीत होते तर कोणी त्रिशूलची सजावट होती कोणी तर जरांगे पाटील यांचे काही शेतकरी यांनी चलो मुंबई अशी आपल्या बैलावर नाव टाकण्यात आले पोळा हा सण दावरवाडी पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी साला बाद प्रमाणे दावरवाडी येथील पोळा उत्साहाचे मानकरी प्रदीप विनायकराव जगताप यांच्या हस्ते पोळा संपल्यानंतर ह्या तोरण त्यांच्या हस्ते तोडण्यात आले यावेळी पाचोड पोलीस स्टेशनचे संतोष चव्हाण यांचा चोख बंदोबस्त होता पोळा बघण्यासाठी गावातील नागरिकांची मोठी गर्दी जमली होती यावर्षी महाराष्ट्र शासनाने डीजेवर बंदी आणल्याने बैल मालक संताप व्यक्त करत होते

## नीट परिक्षेत डॉ अक्षय खरवडे यांचे घवघवीत यश

तलवाडा ।प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून दीड वर्षापासून तलवाडा पंचक्रोशीतील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून रुजू झाल्यापासून डॉ अक्षय खरवडे , यांनी चांगल्या पद्धतीने गोरगरीब रुग्णांना सेवा देत आहे. ते रुजू झाल्यापासून दीडशे ते २०० ची ओपीडी रोज तलवाडा प्रथमिक आरोग्य केंद्रात होत आहे. गेवराई तालुक्यातील ग्रामीण भागातील खेड्यातील रुई गावातील शेतकरी कुटुंबात जन्म घेतलेल्या डॉ अक्षय खरवडे यांनी नीट पीजी २०२५ या पदव्युत्तर शिक्षणासाठी घेण्यात आलेल्या परीक्षेत ८०० पैकी ५५५ गुण मिळवत देशात १००३९ रँक पटकावून घवघवीत यश मिळवले खरवडे कुटुंबाची त्यांनी मान



उंचवली व पुढील

पदविचे शिक्षण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सोलापुर व आता पदवीनंतरचे शिक्षण देखील शासकीय कॉलेज मधून च होणार असल्याचे आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले आहे.नीट परिक्षेत डॉ अक्षय खरवडे यांनी घवघवीत यश मिळवल्याबदल नातेवाईक, मित्रपरिवार ,व डॉक्टर फीड, मधील सर्व सहकारी मित्रा कडून शुभेच्छाचा वर्षाव केला जात आहे .

## कोल्हारवाडी येथे बैलपोळा उत्साहात साजरा

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कोल्हारवाडी या शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या गावात सालाबादप्रमाणे यंदाही बैलं पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गावातील सर्व बैलांची एकत्रित ढोलीबाजा व हलगीच्या निनादात भव्य मिरवणूक काढण्यात आली होती.सर्व शेतकरी, युवक मंडळी या मिरवणुकीत सहभागी झाले होते. पारंपारिक लेझीम हा खेळ खेळला गेला. गावातील माता भगिनींनी जागोजागी शेतकऱ्यांना औक्षण करून बैल राजाची विधिवत महापुजा केली. गावात आनंदीआनंद पसरला होता, यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांच्या वतीने सर्व



शेतकऱ्यांनचा फेटा व पुष्पहार घालून सन्मान करण्यात आला व सिंघन अण्णा यांनी आपल्या मनोगतात सर्वांना शुभेच्छा दिल्या व फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.शेवटी बजरंग बली च्या मंदिरासमोर सर्व बैल राजांचा सामुहिक विवाह सोहळा पार पडला,या सोहळ्याला गावातील शेतकरी,मजुर,युवक व माता भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जांबुवंत विद्यालय, रोहिलागड येथे ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा

रोहिलागड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील मौजे रोहिलागड येथील जांबुवंत विद्यालयात ७८ वा स्वातंत्र्य दिवस मोठ्या उत्साहात आणि देशभक्तिपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्ताने विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. दवणे सर यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून श्री. गोविंद दादा वैद्य, श्री. कल्याणराव टकले, रणजीत जाधव, तसेच पत्रकार भरत टकले उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या उपस्थितीत स्वातंत्र्य दिनाच्या महत्त्वाचा पुनः एकदा गौरव करण्यात आला.

विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतांचे सादरीकरण करून वातावरण अधिक



प्रेरणादायी केले. अमृता होलगे आणि निदा शेख यांनी आपल्या प्रभावी भाषणांमधून भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील बलिदान, संविधानाचे मूल्य, आणि युवकांची जबाबदारी यावर प्रकाश टाकला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अमृता होलगे व अनन्या गाढे यांनी उत्कृष्टपणे पार पाडले. त्यांनी शिस्तबद्ध आणि समर्पित पद्धतीने संपूर्ण कार्यक्रमाचे संचालन करून उपस्थितांचे विशेष कौतुक मिळवले.या प्रसंगी विद्यालयाचे सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कृत्रिम बुद्धिमत्तेवर संशोधनासाठी शिवसंकल्प सुर्यवंशी यांची मलेशियासाठी निवड

धर्माबाद ।प्रतिनिधी

येथील हु.पानसरे शाळेत दहावीपर्यंतचे शिक्षण घेतलेला धर्माबाद येथील शिवसंकल्प सदाशिव सुर्यवंशी हा नागपूर येथील जी.एच. रॉयसोनी कॉलेज मध्ये अभियांत्रिकी विभागात अंतिम वर्षातील शेवटच्या टप्पात शिक्षण घेत असून कॉलेजच्या वतीने कृत्रिम बुद्धिमत्तेवर संशोधनासाठी चार महीन्यांसाठी मलेशिया येथील आय .एन. टी.आय इंटरनॅशनल यूनिवर्सिटी मध्ये पुढील शिक्षणासाठी पाठवित असल्यामुळे शिवसंकल्पचे कौतुक होत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, शिवसंकल्प सदाशिव सुर्यवंशी हा पहीली ते दहावीपर्यंतचे शिक्षण शहरातील हु.पानसरे शाळेत घेतला आहे. अकरावी व बारावी लाल बहादूर शास्त्री महाविद्यालयात पूर्ण केला आहे. त्यांनतर नागपूर येथील जी. एच. रॉयसोनी कॉलेज मध्ये अभियांत्रिकी विभागात शिक्षण घेत असून पुढील उच्च शिक्षणासाठी तथा कृत्रिम बुद्धिमत्तेवर संशोधनासाठी मलेशियाला येथील आय. एन. टी . आय इंटरनॅशनल यूनिवर्सिटी येथे पाठवित असल्यामुळे धर्माबाद शहरातील जनतेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. रविवारी सकाळी नागपूर येथील इंटरनॅशनल विमानतळावरून मलेशियाला रवाना होत असल्यामुळे सर्वस्तरातून शिवसंकल्पचे कौतुक होत आहे. शिवसंकल्पचे आई व वडील शिक्षक आहेत. साईनाथ तिम्मापुरे, कृष्णा तिम्मापुरे व



हदगाव तालुक्यातील उंचेगाव जि. परीषद शाळेचे मुख्याध्यापक संतोष तिम्मापुरे यांचा शिवसंकल्प भाचा आहे.

## भटक्या कुत्र्यांप्रमाणे मुलींची छेड काढणाऱ्या रोड रोमियोंची पण 'नसबंदी' करा

### शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांची धाडसी भूमिका

बीड ।प्रतिनिधी

समाजात मुलींच्या छेडछाडीच्या वाढत्या घटनांनी असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांनी धाडसी भूमिका घेतली असून सुप्रीम कोर्टाने भटक्या कुत्र्यांच्या नसबंदीचा घेतलेला निर्णय दाखल देत, मुलींची छेडछाड करणाऱ्या रोडरोमिओं ची पण नसबंदी करून कठोर कारवाई व्हावी, अशी कठोर व धाडसी भूमिका सचिन



मुळूक यांनी मांडली.

शहर असो वा ग्रामीण भाग, मुलींच्या छेडछाडीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत आहेत. शाळा-महाविद्यालयीन तरुणींना वर्गात जाताना, बाजारात खरेदी करताना, अगदी प्रवासादरम्यानही रोडरोमिओंच्या टोमण्यांना वागणुकीला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे मुलींच्या शिक्षणावर, मानसिकतेवर आणि आयुष्यावर थेट परिणाम होत आहे. बीडसह राज्यभरात पोलिसांकडून रोडरोमीओंवर कारवाई करण्यात येत असली तरी मुलींच्या छेडछाडीचे प्रकार सुरुच आहेत. रोडरोमिओंना थांबवण्यासाठी कायदे आहेत, परंतु त्यांची अंमलबजावणी किती प्रभावी होते हा मोठा प्रश्न आहे. मुलींच्या सुरक्षिततेशी खेळणाऱ्यांना रोखण्यासाठी केवळ कायदे करणे पुरेसे नाही. मोकाट कुत्र्यांप्रमाणेच मुलींना त्रास देणाऱ्या रोडरोमिओंचीही नसबंदी करायला हवी. तेव्हाच अशा प्रकारांना आळा बसेल

# ज्येष्ठ पत्रकार सर्वोत्तम गावरस्कर यांचा आज नागरी सत्कार

## सत्काराला उपस्थित राहण्याचे मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांचे आवाहन

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचे सुपुत्र ज्येष्ठ संपादक सर्वोत्तम गावरस्कर अण्णा यांना मराठी पत्रकार परिषदेचा नागोजीराव दुधगावकर स्मृती राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. याबद्दल त्यांचा आज भव्य नागरी सत्कार रविवार दिनांक २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता जालना रोडवरील हॉटेल अन्वीता येथे पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख हे राहणार असून प्रमुख



पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांच्यासह सर्व सन्माननीय संपादक उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे माजी



विभागीय सचिव दिलीप खिस्ती, विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे ,राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय आरबुणे ,जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर ,जिल्हा समन्वयक अभिमान्यु घरत, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत राजहंस, सचिन पवार,अविनाश कदम, जुनेद बागवान, दिलीप झगडे, संजय रानभरे, गौतम बचुटे ,कादर मकरानी , तालुका अध्यक्ष दत्ता आजबे, मधुकर तौर, जालिंदर नन्नवरे ,अजय जोशी, हरीश यादव, विजय आरकडे, सतीश सोनवणे, प्रशांत लाटकर आदींनी केले आहे.

# श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी युवराज धोंडगे, उपाध्यक्षपदी अंकुश कुकडेजा तर सचिवपदी अमित कदम

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नावाजलेले श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाची बैठक ज्येष्ठ मार्गदर्शक शेखर जवकर, अंबादास नवले, वसंत कदम, दत्ता व्यवहारे, सचिन जवकर,अमोल काळे,ॲड.सुधिर जाधव, अजित कदम,धर्मेश कदम,प्रविण साळुंके,शितल राऊत, मनोज नवले, सुनील कोकाटे, चंदन दातवाणी, अमरापूरकर सर यांच्या मार्गदर्शनाखाली जवकर मंगल केंद्र बलभिम चौक येथे नुकतीच बैठक संपन्न झाली. या बैठकीत सर्वानुमते श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी युवराज धोंडगे, उपाध्यक्षपदी अंकुश कुकडेजा, सह उपाध्यक्ष विनय नवले, सचिवपदी अमित कदम, कोषाध्यक्षपदी गणेश कदम, सह काषाध्यक्षपदी अभिषेक नवले तर व्यवस्थापक पदी आकाश व्यवहारे यांची निवड करण्यात आली.

श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाचे यंदाचे ५९ वे वर्ष असून







यंदा गणेशोत्सव काळात विविध सामाजिक उपक्रम राबविले जाणार जाणार आहेत. श्री कालिंका बलभिम गणेश मंडळाने यापूर्वी समाजात जनजागृतीसाठी बेटी बचाव..बेटी पढाव, झाडे लावा..झाडे जगवा, पाणी अडवा, पाणी जीरवा, एचआयव्ही जनजागृती, रक्तदानाचे महत्व, देशभरातील प्रसिध्द तिर्थक्षेत्र असे विविध देखाव्याचे सादरीकरण केले आहे. या मंडळाने सलग १० वर्षे देखाव्याचे प्रथम पारितोषीक पटकाविलेले आहे.

सन २०२४ च्या गणेशोत्सव काळात उत्कृष्ट मिरवणूकीबद्दल जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालया मार्फत प्रथम पारितोषिक मिळाले असून यंदाच्या गणेशोत्सवात देखील उत्कृष्ट देखाव्याचे सादरीकरण व भव्य अशी मिरवणूक काढण्याचा संकल्प मंडळाच्या पदाधिकार्यांनी केला आहे. श्री कालिंका बलभीम गणेश मंडळाच्या नुतन पदाधिकार्यांच्या निवडीबद्दल विशेष अभिनंदन बीड जिल्हा शिवसेना उपजिल्हा प्रमुख अजय जाधव, श्रीमंत गोतावळे, संन्मत्ती पोरवाल, संदीप जाधव, प्रा.विजय जाधव, संतोष कदम, कामेश जवकर, नाचरे सर, सार्थक कदम, स्वयंम नवले, यश जवकर, समर्थ नवले, तुपकर, आसाराम सोनवणे यांच्यासह सर्व गणेश भक्तांनी केले आहे.

# गेवराईच्या बिडिओ कांबळे रजेवर



अनिरुद्ध सानप यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार

बीड ।प्रतिनिधी

गेवराई पंचायत समितीच्या गट विकास अधिकारी श्रीमती कांबळे या रजेवर गेल्यामुळे बिडिओ पदाचा अतिरिक्त कार्यभार अनिरुद्ध सानप यांच्याकडे देण्यात आला आहे. श्रीमती कांबळे यांच्या विनंती अर्जानुसार बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी रजा मंजुरी दिली आहे. दरम्यान सानप यांनी गुरुवारी पदाचा कार्यभार स्वीकारला असून त्यांचा विविध व्यक्ती व संघटनांनी त्यांनी त्यांचा सत्कार केला.

गटविकास अधिकारी श्रीमती कांबळे यांचा सेवानिवृत्तीचा कालावधी अवघा दोन महिन्यात राहिल्यामुळे त्यांनी १५ दिवसापूर्वी रजा मिळावी यासाठी बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता. तथापि पालकमंत्री यांच्या दौऱ्यामुळे त्यांना रजा मंजूर करण्यात आली नव्हती.

दरम्यान गट विकास अधिकारी कांबळे यांच्या कामकाजाविषयी गेवराईच्या लोकप्रतिनिधींच्या तक्रारी होत्या. त्यामुळे कांबळे यांना दिनांक २१ रोजी रजा मंजूर करण्यात आली आहे. गेवराई पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी पदाचा अतिरिक्त कार्यभार बीड पंचायत समितीला कार्यरत असलेल्या कृषी अधिकारी अनिरुद्ध सानप यांच्याकडे देण्यात आला आहे.

# पीक विमा कंपन्यांचे दलाल सरकारच शेतकऱ्यांच्या मुळावर

## स्थानिक आपत्तीचा निकष वगळल्याने २५ टक्के अग्रीम नुकसानभरपाई बंद

पुर्वीप्रमाणेच ट्रेगर करण्यात यावेत- डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

अगोदरच पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना विमा भरपाई देण्यात चालढकल होत असतानाच, पीक विमा कंपन्यांचे दलाल झालेले राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. पीक विमा योजनेतून नुकसानभरपाईसाठी पात्र असलेले स्थानिक आपत्तीमुळे झालेले नुकसान, काढणीपूर्व किंवा काढणीनंतर झालेले नुकसान, पेरणी न झाल्याने झालेले नुकसान हे महत्वाचे निकषच वगळण्यात आले आहेत.

यामुळे शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पंचनामा करून मिळणारी २५ टक्के अग्रीम रक्कम आता मिळणार नाही. सरकारने नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या असल्या तरी स्थानिक आपत्तीचे ट्रेगर रद्द केल्याने आठवडाभरात झालेल्या नुकसान



भरपाईची मागणी पीक विम्यातून होणारच नाही. त्यामुळे सरकारने संकटाच्या काळात नियमित हक्काची मदत २५ टक्के अग्रिम देण्यासाठी पुर्वीप्रमाणेच ट्रेगर सुरू करावेत, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना करण्यात आली असून सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

शासनाच्या बदलेल्या निकषाने शेतकरी हवालदिल

राज्य शासनाने पिक विम्याच्या संदर्भाने स्थानिक आपत्तीचा निकष बदलल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पीक विमा म्हणजे शेतकऱ्यांचे सुरक्षा कवच समजले जात होते. पूर्वी विमा योजनेत ४ ट्रेगर होते.

अतिवृष्टीमुळे पिके वाहून गेली, पिके पाण्यात बुडून नासली

यामुळे शेतकऱ्यांचा खर्च निघत असल्याने दिलासा मिळत असे. पण विमा कंपन्यांनी सत्ताधाऱ्यांना हाताशी धरून अतिवृष्टी व कोरडे ट्रेगर वगळून फक्त पीक कंपनी हा एकमेव ट्रेगर ठेवला आहे.

वांझोट्या पंचनाम्याचा शेतकऱ्यांना उपयोग काय ?

या आठवड्यात जिल्ह्यात पावसाने घातलेल्या धुमाकूळामुळे शेकडो हेक्टरवरील खरीप पिके उद्धस्त झाली आहेत. शेतकरी या नुकसानीचे फोटो काढून तक्रार करत आहेत. मात्र हे ट्रेगरच उपलब्ध नसल्याने या तक्रारीचा काहीही उपयोग होणार नाही.मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पंचनामे करून अहवाल पाठवण्याच्या सूचना केल्या असल्या तरी मागचा अनुभव लक्षात घेता, शासनाची मदत केव्हा मिळेल याचा नेम नाही. त्यामुळे या वांझोट्या पंचनाम्याचा शेतकऱ्यांना काहीही उपयोग नाही.

शेतकऱ्यांची मागणी...

सध्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. संकटाच्या काळात नियमित व हक्काची मदत मिळावी यासाठी पीक विमा कंपनीचे ट्रेगर पूर्वीप्रमाणेच सुरू करावेत, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

# प्राथमिक आश्रम शाळा वसंतनगर तांडा येथील कर्मचारी श्रीनाथ गीतेची संस्थाचालकाच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खळबळ उडवून देणारी घटना घडली असुन परळी तालुक्यात एका युवक कर्मचाऱ्याने स्वतःला गळफास लावून आपले जीवन संपवले आहे. नोकरीमध्ये संस्थाचालकांकडून गेले अनेक वर्षापासून सातत्याने होणारा मानसिक छळ, अगोदर केज आणि त्यानंतर परळी तालुक्यातील संस्थाचालकांनी पैसे न भरता अनुकंपावर नोकरी करतो म्हणून सातत्याने मानसिक त्रास दिला. यातूनच या कर्मचाऱ्याने आत्महत्या केली आहे.



परळी तालुक्यातील नंदागौळ येथील रहिवाशी वसंत नगर येथील आश्रम शाळेत कार्यरत मयत आश्रम शाळा कर्मचारी श्रीनाथ गोविंद गीते वय २५ वर्ष याने नंदागौळ येथील त्याच्या राहत्या घरी एका खोलीमध्ये दिनांक २२ ऑगस्ट रोजी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना घडली. याबाबत त्याच्या आईने पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे की, सानेगुरुजी निवासी विद्यालय केज चे संस्थाचालक उद्धव माणिक कराड व प्राथमिक आश्रम शाळा वसंतनगर तांडा परळीचे संस्थाचालक संजय परशुराम राठोड या दोघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आश्रम शाळा वसंत नगर येथे मयत श्रीनाथ गोविंद गीते कामाठी या पदावर सध्या कार्यरत होता. त्याचे वडील सहशिक्षक म्हणून केज येथील आश्रम शाळेत कार्यरत होते. नोकरीवर असताना २०१० मध्ये त्यांचे निधन झाले होते. त्यानंतर अनुकंपा तत्त्वावर श्रीनाथ गीते यांना घेण्यासाठी संस्थाचालक उद्धव कराड यांनी नकार देत सातत्याने हीन वागणूक दिली. पैशाची मागणी केली. आपण त्यास फुकट रुजू करून घेणार नाही अशी भूमिका घेतली होती. त्यानंतर सामाजिक न्याय विभागाकडे त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. २०२४ पर्यंत याचा पाठपुरावा

केल्यानंतरही न्याय मिळत नव्हता. त्यामुळे या कुटुंबाने सामाजिक न्याय विभागाकडे या मागणीसाठी पाठपुरावा केला तसेच उपोषणही केले. प्रशासनाने याची दखल घेत मयत श्रीनाथ गीते यास बीड जिल्ह्यातील कोणत्या शाळेत रिक्त असलेल्या जागेवर घ्यावे याबाबतचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा येथील आश्रम शाळेत रुजू होण्याबाबतचे लेखी पत्र काढले. परंतु या

ठिकाणीही संस्थाचालकाच्या मानसिक त्रासाला त्याला सामोरे जावे लागले. वरिष्ठ कार्यालयाचे आदेश असताना सुद्धा वसंतनगर येथील आश्रम शाळेच्या संस्थाचालक यांनी त्यास सुरुवातीला रुजू करून घेण्यास नकार दिला. त्यानंतर या कुटुंबाने व त्याच्या आईने आत्मदहनाचा इशारा दिला होता. दरम्यानच्या काळात या कुटुंबाने या नोकरीसाठी २०१० ते २०२५ पर्यंत संघर्ष केला. त्यानंतर वसंतनगर येथील आश्रम शाळेत कसेतरी त्यास रुजू करून घेण्यात आले. मात्र रुजू झाल्यापासून त्यास प्रचंड मानसिक त्रास व पगार न काढण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याचे त्याच्या आईने फिर्यादीत म्हटले आहे. परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा येथील आश्रम शाळेचे संस्थाचालक यांनी त्यास जाणून बुजून काम करताना त्रास देणे, हीन वागणूक देणे, इतर शिक्षक व कर्मचाऱ्यासमोर आपमानास्पद वागणूक देणे, तू केजच्या संस्थाचालकाबरोबर भांडण का केलेस तुझा पगार निघू देणार नाही अशा सातत्याने धमक्या दिल्या. त्यामुळे मयत श्रीनाथ गीते हा सतत तणावातच राहत आला. या सर्व मानसिक तणावातूनच त्याने अखेर राहत्या घरी गळफास लावून आपले जीवन संपवले. त्याच्या आत्महत्येस आश्रमशाळा संस्थाचालक उद्धव कराड व संजय राठोड हे संस्थाचालक जबाबदार असल्याचे फिर्यादीत त्म्हटले आहे. या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात या दोन संस्था चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास परळी ग्रामीण पोलीस करत आहेत.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल युसुफ वडगाव शाळेमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न

## विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेतूनही आपले करिअर घडवले पाहिजे- बापूसाहेब भुसारी

केज/प्रतिनिधी

कै.सिद्धलिंगाप्पा भुसारी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित,इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल युसुफवडगाव या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ वर्षातील एम.टी.एस.ऑलंपियाड शासनमान्य राज्यस्तरीय परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला.याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विमा प्रतिनिधी धनंजय चोपणे तर प्रमुख पाहुणे म्हणून इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूलचे संचालक तथा मुख्याध्यापक श्री. बापुसाहेब भुसारी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर शाळेतील सहशिक्षिका सौ.अंजली तानगे,डव्होकेट सौ. प्रियंका बापुसाहेब भुसारी,सांस्कृतिक विभाग प्रमुख सौ. प्रियंका थळकरी आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील सहशिक्षक तसेच एम.टी.एस. ऑलंपियाड समन्वयक सौ.पल्लवी अग्निहोत्री यांनी केले.याप्रसंगी त्या म्हणाल्या की,इरा इंटरनॅशनल इंग्लिश स्कूल या शाळेचा आलेख केवळ गुणात्मक नव्हे तर संख्यात्मक ही वाढत आहे.एम.टी.एस. ऑलंपियाड परीक्षेमध्ये स्पेशल मोमेंटो प्राप्त २ विद्यार्थी,गोल्ड मेडल प्राप्त २० विद्यार्थी, सिल्वर मेडल प्राप्त २१ पास १५ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. बापुसाहेब भुसारी म्हणाले की,विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेतून ही आपले करिअर घडवले पाहिजे.त्या दृष्टिकोनातून यशस्वी वाटचाल केली पाहिजे. यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये विद्यार्थ्यांचा पाया घडविणाऱ्या शिक्षकांचे योगदान फार महत्त्वाचे असते.यशाची ही परंपरा अखंडपणे चालू ठेवण्याची ग्वाहीयावेळी त्यांनी दिली.शेवटी त्यांनी सर्व स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही अभिनंदन केले.




एम.टी.एस.ऑलंपियाड मधील ट्रॉफी प्राप्त विद्यार्थी -अर्जून सोमनाथ भुमकर,प्रियल उमाशंकर तोडकर,गोल्ड मेडल प्राप्त विद्यार्थी -दिव्या प्रविण अग्रीहोत्री,गुंड समीक्षा गणेश,श्रीशा श्रीरंग तानगे,सिद्धि सचिन मोरे,विराज बालासाहेब इंगले,अथर्व महादेव सरकटे,सिद्धी संदिप जोशी,अखिलेश अमोल पाटील,अमित संदिप जोशी,शिवप्रसाद गणेश रोडगे,महिराज जयराज मांगडे,रियांश राधेश्याम खंडेलवाल,तन्वी अनंत थळकरी,स्वरूप शिवानंद भुसारी,परी उमेश खरबड,तन्वी आशिष जावळे,शरण्या शिवाजी पिल्ले,शांभवी शिवदास थळकरी, अपेक्षा राहुल सावंत इत्यादी.

एम.टी.एस.ऑलंपियाड सिल्व्हर मेडल प्राप्त विद्यार्थी -हंडिबाग अनुष्का गजेन्द्र,राऊत पृथ्विराज अरुण,डोंगरे सार्थक अमोल,स्नेहल धनराज चोपने,उज्वल उमाकांत भुसारी,समर्थ ज्ञानोबा सुरवसे,शिवप्रसाद शाम लामतुरे,यशराज अरूण राऊत,आरव संतोष टिंगरे,आर्यन नवनाथ जाधव,प्रणव पवन इंगळे,प्रशांत विनोद एडके,रिशांक विजय भुमकर,स्वराली सचिन पाटू, शिवम शरद शिंदे, चौरे चैत्राली उमाकांत इत्यादी

विद्यार्थ्यांच्या यशस्वीते साठी शाळेतील सर्व शिक्षकवृंदानी अथक परिश्रम व वेळोवेळी मार्गदर्शन केले.यामध्ये अंजली तानगे,योगिता चौधरी,पल्लवी अग्निहोत्री,शेख आफरीन,प्रियंका थळकरी,ज्योती वैरागे, गीता काळे,श्वेता मोडवे, प्रियंका भुसारी इत्यादी कार्यक्रमाचे सूत्रसंचलन पल्लवी अग्निहोत्री यांनी केले.तर आभार प्रियंका बापुसाहेब भुसारी यांनी मानले.

## 'एक हात मदतीचा' : खुशी सेवाभावी संस्थेचा पूरग्रस्तांना दिलासा



देगलूर/प्रतिनिधी

मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रात रविवारी झालेल्या मुसळधार पावसामुळे हसनाळ, भिंगोली, भेंडेगाव, रावणगाव, मारजवाडी,भासवाडी या गावांत पूरस्थिती निर्माण झाली. शेतमाल वाहून गेला, जनावरे दगावली, घरे उद्ध्वस्त झाली आणि शेकडो कुटुंबांवर संकट कोसळले.

अशा कठीण प्रसंगी खुशी सेवाभावी संस्था तातडीने पुढे सरसावली. संस्थेच्या वतीने रावणगावसह परिसरातील पूरग्रस्तांना शेकडो अन्नधान्य किटचे वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष एकनाथ (बबलू) टेकाळे यांनी प्रत्यक्ष गावात जाऊन पाहणी केली. पूरग्रस्तांशी संवाद साधताना त्यांनी सांगितले की, गावातील परिस्थिती अतिशय भीषण आहे. अनेक कुटुंबांचे संसार वाहून गेले असून त्यांना तातडीने मदतीची गरज आहे. अशा वेळी प्रत्येकाने आपल्या परीने मदतीचा हात पुढे करणे आवश्यक आहे.

बबलू टेकाळे यांनी याआधीही अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, सणासुदीच्या काळात गरीब कुटुंबांना मदत, तसेच कोणत्याही धर्म-जातीचा भेद न करता समाजासाठी कार्य हे त्यांचे वैशिष्ट्य आहे.पूरग्रस्तांना दिलासा देऊन त्यांनी पुन्हा एकदा आपली सामाजिक बांधिलकी जपली आहे. संकटाच्या काळात मदतीचा एक हातही मोठा आधार ठरतो, हे त्यांच्या कार्यातून अधोरेखित झाले.या वेळी संपादक गजानन टेकाळे, पत्रकार शेख असलम, धनाजी देशमुख, बालाजी चंदावाड, शेखर कोठारे, अनिल कांबळे, गंगाधर उल्लेवार, दीपक पिंटू फुगारे, आदी उपस्थित होते.



शिरूर (प्रतिनिधी)

शहरातील आयडियल इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भारतीय नकाशाची प्रतिमा साकारली आहे.तसेच तिरंग्याच्या वेशातील विद्यार्थ्यांनी इंडिया नाव तयार करून पालकांचे लक्ष वेधले.या प्रतिकृतीची संकल्पना मुख्याध्यापक राकेश पवार यांची होती.या वेळी संस्थाचालक डॉ.भगवान सानप यांच्यासह अभिजीत डुंगरवाल,प्रकाश देसरडा,संतोष ढाकणे,विनोद डुंगरवाल, किरण देसर्डा,राजेंद्र मंडलेचा,गणेश देशपांडे आदींसह शाळेचा स्टाफ आणि पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.


# देगलूर-बिलोलीत लॅम्पी स्किनचा प्रादुर्भाव

## आ. जितेश अंतापूरकर यांची तातडीच्या उपाययोजनांची सूचना

देगलूर ।प्रतिनिधी

देगलूर-बिलोली विधानसभा क्षेत्रात लॅम्पी स्किन आजाराने पशुधन ग्रासू लागल्याने शेतकरी व पशुपालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार जितेश अंतापूरकर यांनी जिल्हा पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना तातडीने तपासणी, औषधोपचार व प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याचे निर्देश दिले आहेत.

आ. अंतापूरकर यांनी पशुवैद्यकीय यंत्रणेला सतर्क राहण्याचे आदेश दिले असून, देगलूर व बिलोली तालुक्यातील संबंधित अधिकाऱ्यांनी गावोगावी जाऊन पशुपालकांशी संपर्क साधावा, जनजागृती करावी, तसेच कोणताही विलंब न करता



औषधोपचार उपलब्ध करून द्यावेत, असे सांगितले.

जनावरांना अचानक ताप येतो, अंगावर गाठी येतात. काही जनावरे खात नाहीत, अशा प्रकारचे लक्षणे दिसून येतात प्रशासनाने लवकर औषधोपचार करावेत,पशुवैद्यकीय अधिकारी वेळेवर यायला हवेत. औषध उपलब्ध झाले तर जनावरे वाचू शकतील. अन्यथा मोठे नुकसान होईल, असेही शेतकरी सांगत आहेत.-

(शेतकरीशेतकरी व पशुपालक रावसाहेब पाटील गवंडगाव)

पशुपालकांच्या हितासाठी प्रशासनाने सजग राहावे, जनावरांच्या जीविताला धोका होणार नाही याची दक्षता घ्यावी, असेही आमदार अंतापूरकर यांनी बजावले.

# देशाच्या प्रगतीसाठी अखंडता, मानवता व सद्भावना महत्त्वाची - ह.भ.प.डॉ.सय्यद पारनेरकर महाराज

## प्रश्नमंजुषा स्पर्धा व एम.एस-सी.आय.टीतील यशवंतांचा आई सेंटर प्रो कॅम्पस येथे सत्कार

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आपल्या देशाचा स्वातंत्र्य दिवस साजरा करीत असताना प्रत्येक नागरिकांनी अखंडता, मानवता व सद्भावना अंगिकारल्यास ते देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे असल्याचे प्रतिपादन ह.भ.प. डॉ.सय्यद रफिक पारनेरकर महाराज यांनी केले. ते आई सेंटर प्रो कॅम्पस मध्ये आयोजित 'हम सब एक है' या कार्यक्रमात बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विश्वविक्रमवीर सर नागेश जोंधळे (संचालक आई सेंटर प्रो), प्रमुख मार्गदर्शक म्हणून ह.भ.प.डॉ.सय्यद पारनेरकर महाराज हे होते. तर यावेळी राष्ट्रपती पदक विजेते सय्यद रेहमान, संगणक तज्ज्ञ सुनिल वाघमारे (संचालक रेखा कम्प्युटर्स) व सुमित खोत (संचालक वैजंती कम्प्युटर्स), कृतिशील मुख्याध्यापिका पुनम माने व ॲड.अलीम शेख यांची विचारमंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ.पारनेरकर महाराज म्हणाले की, आईचे कार्य हे अत्यंत मोलाचे आहे. अगदी बालवयापासूनच योग्य अशी जडण-घडण व सुसंस्कार केल्यास आपला पाल्य हे एक चांगला मुलगा-मुलगी या सोबतच देशाचे व समाजाचे मोठे नेतृत्व होऊन या संपूर्ण जगाला शांतीच्या संदेश देणार तथागत गौतम बुद्ध, महात्मा गांधी तसेच गरज पडल्यास आपल्या हक्कांसाठी लढा उभारणारे व तो लढा यशस्वी करणारे विश्व वंदनीय छत्रपती शिवाजी महाराज, ज्ञानाचे प्रतीक महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, नोबेल







पारितोषिक विजेते नेल्सन मंडेला, भगतसिंग, चंद्रशेखर आझाद, सावित्रीमाई फुले, फातिमा शेख इत्यादीं सारखे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व घडण्यास व सुसंगत, सदाचारी समाज व देश घडण्यास आईचे योगदान बहुमोल ठरते. यासाठी प्रशिक्षण व शिक्षण क्षेत्रात अग्रगण्य असलेले आई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित आई सेंटर प्रो व इंग्लिश विंग्स प्रि-स्कूलच्या माध्यमातून विश्वविक्रमवीर सर नागेश जोंधळे यांनी जागतिक भाषा इंग्रजी व व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच विद्यार्थी व पालकांतील सुसंवाद, अत्याधुनिक विज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान, करिअरच्या राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संधी, समाजभान व देशाचा प्राण संविधान त्याचेही अविरतपणे व मोठ्या उत्साहाने कार्य करत असल्याचे अधोरेखित करत पुढील कार्यास मंगलकामना व्यक्त केली. यावेळी एमकेसीएल व वैजंती कम्प्युटर्स तर्फे भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धेत ३०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला यामध्ये वेणुताई चव्हाण कन्या शाळेतील कु.वैष्णवी बालासाहेब गोरे (प्रथम), स्नेहा सतीश भोसले (द्वितीय), सरिता सुदाम पवार (तृतीय) तसेच, जिजाऊ विद्यालयातील कु.रिद्धी राहुल साळुंखे (प्रथम), वेदांत रवी पवार (द्वितीय) व श्रावणी राजेश जाधव (तृतीय) यांचे समवेत एम.एस.सी-आय.टी (अर्थात महाराष्ट्र स्टेट सर्टिफिकेट इन इंफॉर्मेशन टेक्नॉलॉजी) माहे ऑगस्ट-२०२५ मध्ये वैजंती कम्प्युटरचे संचालक सुमित शंकरराव खोत यांच्या मार्गदर्शनात झालेल्या परीक्षेत उत्कृष्ट गुण प्राप्त केलेले अनुक्रमे सृष्टी चित्रा जोगदंड (प्रथम), प्रज्ञानंद सरवदे (द्वितीय), ओंकार राख (तृतीय) यांनाही मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह, प्रशस्तीपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोनम कांबळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार सुमित खोत यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी धम्मदीप वैद्य, रोहन खंदारे, सुशील गडकर, तुकाराम केदार, पुरूषोत्तम तिवारी, सोनम कांबळे, आफरीन शेख, श्रीदेवी गडकर, साक्षी कराड, सार्थक जाधव, सोनम सानप, सेजल कलशेट्टी, प्रतिमा भताने, प्रांजल मुंडे,

## कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय याचे जिल्हास्तरीय वेटलिफ्टिंग क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



केज (प्रतिनिधी)

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिवद्वारा आयोजित दिनांक २१ ऑगस्ट २०२५ रोजी श्री व्यंकटेश महाजन कॉलेज धाराशिव येथे जिल्हास्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धा पार पडल्या.त्यामध्ये कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशीच्या कनिष्ठ विभागातील १९ वर्षाखालील मुली व मुले यांनी क्लीन अँड जर्क व स्न्याच मध्ये यश संपादन केले.त्यामध्ये ४८ केजी वजन गटात कु.धनश्री गायकवाड यांनी द्वितीय क्रमांक ५८ के जी वजन गटात कु. शदीक्षा झोरे द्वितीय क्रमांक ६९ केजी वजन गटात कु.राजनंदिनी चव्हाण द्वितीय कु. श्रुती सावंत तृतीय क्रमांक ७७ केजी, समीक्षा वाघमारे प्रथम तर कु.मानसी यादव हिने तृतीय क्रमांक मिळवला ८६ केजी गटामध्ये कु.प्रतीक्षा वाघमारे यांनी प्रथम क्रमांक तर कु.प्रतीक्षा गायकवाड द्वितीय क्रमांक मुलांमध्ये ७१ केजी गटात साद मुजावर यांनी प्रथम क्रमांक मिळवला. ६० केजी वजन गटात हर्षल चेडे यांनी तृतीय क्रमांक मिळवला खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. सर्व विजयी खेळाडूंचे प्राचार्य डॉ.अशोक कदम सर यांनी कौतुक केले तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळा चे सचिव पी.टी.पाटील साहेब खजिनदार जयकुमार शितोळे साहेब यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.या प्रसंगी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक श्री.शशीकांत सरवदे सर यांनी केले. प्राचार्य डॉ.ए.बी कदम सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.व आभार श्री.अजित तिकटे सर यांनी मानले.

# मंठा पोलिसांची दंगाकाबू रंगीत तालीम व रूट मार्च

## गणेशोत्सवासाठी पोलिस दल सज्ज


डॉ आशिष तिवारी/मंठा

आगामी गणेशोत्सव व विविध सणांच्या पार्श्वभूमीवर मंठा पोलिस ठाण्याच्या वतीने रविवारी सायंकाळी दंगाकाबू रंगीत तालीम, लाठी ड्रिल व ड्राय वेपन प्रॅक्टिसचे आयोजन करण्यात आले. या सरावानंतर पोलिस दलाने मंठा शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य रूट मार्च काढत कायदा व सुव्यवस्थेची तयारी दाखवली.

मंठा बसस्थानक परिसरात प्रथम पोलिस दलाने दंगाकाबू तालीम सादर केली. यात पोलिस अंमलदारांनी लाठी ड्रिल, ढाल वापर पद्धत, दगडफेक नियंत्रण, गर्दी पांगविण्याच्या पद्धती तसेच आपत्कालीन परिस्थितीत वेगाने प्रतिसाद देण्याचा सराव केला. पोलिसांनी दाखवलेल्या या शिस्तबद्ध तालीम व सरावाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


यानंतर पोलिस निरीक्षक मनोजकुमार राठोड यांच्या नेतृत्वाखाली शहरातून रूट मार्च काढण्यात आला. शहरातील मुख्य रस्ता, बाजारपेठ, बसस्थानक, पोलीस ठाणे परिसर अशा ठिकाणांवरून पोलिसांचे पथक शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करत गेले. या रूट मार्चमुळे नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली.

तालीम व रूट मार्चमध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक ईधाटे, पोलीस उपनिरीक्षक संतोष माळगे, विठ्ठल केंद्रे, एकूण १५ पोलीस अंमलदार व १२ होमगार्ड सहभागी झाले होते. पोलिसांचा हा सराव व शिस्तबद्ध



पथसंचलन पाहून नागरिकांनी समाधान व्यक्त केले.पोलीस निरीक्षक राठोड यांनी सांगितले की, गणेशोत्सव हा मोठ्या प्रमाणावर साजरा होणारा सण आहे. गर्दीच्या ठिकाणी किंवा अनपेक्षित परिस्थितीत कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिस दल नेहमी तत्पर आहे. या तालीम व रूट मार्चचा उद्देश नागरिकांना सुरक्षिततेचा संदेश देणे हाच आहे.

गणेशोत्सव, मोहर्रम व इतर सणांच्या पार्श्वभूमीवर घेतलेल्या या तालीमेमुळे पोलिस दल सज्ज असल्याचे चित्र स्पष्ट झाले असून, शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिस दल पूर्णपणे कटिबद्ध असल्याचा विश्वास नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.



## सायगाव डोंगरगाव (ता. बदनापूर) येथे बैल पोळा सण उत्साहात साजरा

गजानंन घनघाव यांनी बैल पोळा सणानिमित्त डोंगरगाव (ता. बदनापूर) येथील शेतात बैलांची सपत्नीक परिवार सहित पूजा करून नैवेद्य अर्पण केला. परंपरागत पद्धतीने साजरा करण्यात आलेल्या या सणात वर्षभर शेतीकामात राबणाऱ्या बैलांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

# विद्यार्थ्यांशी न्यायमूर्ती प्रशांत कुलकर्णी यांनी साधला सुसंवाद!



अंबाजोगाई (प्रतिनिधी)

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वामी विवेकानंद बाल विद्या मंदिर, अंबाजोगाई येथे न्यायाधीश संवादिका हा आगळा-वेगळा उपक्रम पार पडला. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून नवक्षितिज बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे सचिव श्री. संतोष दादा कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या व्यासपीठावर माननीय न्यायमूर्ती श्री. प्रशांत कुलकर्णी (चंद्रपूर), आधार माणुसकीचा संस्थेचे सर्वेसर्वा श्री. संतोष पवार, सकाळ वृत्तपत्र समूहाचे प्रख्यात वार्ताहर श्री. प्रशांत बर्दापूरकर, तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती स्वरूपाताई डीग्रसकर मान्यवर पाहुणे म्हणून विराजमान होते.

प्रास्ताविकातून स्वरूपाताईंनी विवेकानंदांचे विचार अधोरेखित करत सांगितले की - मन, मनगट आणि मेंदू यांचा संतुलित विकास म्हणजेच शिक्षण. या ध्येयपूर्तीसाठी शाळेत अशा उपक्रमांचे आयोजन केले जाते.न्यायमूर्ती प्रशांत कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधताना दैनंदिन जीवनातील संघर्ष, सुखदुःख आणि अनुभव साध्या भाषेत उलगडले. आनेवाला पल, जानेवाला है या गीताचा संदर्भ देत त्यांनी जीवनाच्या अस्थिरतेतून मिळणारे धडे अधोरेखित केले. त्यांच्या मिश्कील शैलीने आणि जिवंत उदाहरणांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली.अध्यक्षीय समारोपात संतोष दादा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना मोलाचा संदेश दिला की - माणूस पदाने कितीही मोठा झाला तरी त्याचे पाय जमिनीवरच राहिले पाहिजेत आणि आपल्या पदाबरोबरच आपल्या संस्कारांनाही जपले पाहिजे. तोच खरा यशस्वी माणूस ठरतो.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वेदिका माले व कु. अनन्या निर्मळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन कु. गार्गी देशपांडे हिने केले. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला.

# परभणी जिल्ह्यातील पाच महिलांनी सर केले कळसुबाई शिखर



परभणी ।प्रतिनिधी

महाराष्ट्राचे' एव्हरेस्ट' म्हणून ओळखले जाणारे राज्यातील सर्वोच्च कळसुबाई शिखर सर करण्याचा मान पाथरी सह जिल्ह्यातील पाच महिलांनी मिळवला आहे. शनिवार १६ ऑगस्ट रोजी सकाळच्या सत्रात सुरू झालेल्या या मोहिमेत अवघ्या साडेतीन तासांच्या प्रयत्नांत त्यांनी ५,४०० फूट उंचीवर असलेले शिखर गाठले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील अकोले तालुक्यात बारी गावच्या हद्दीत वसलेले कळसुबाई शिखर हे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न मानले जाते. या शिखरावर चढाई करण्यासाठी पाथरी सह जिल्ह्यातील ज्योत्सना पौळ , रुक्मिण जाधव, किरण धर्मे , रंजना जाधव ,रोहिणी दिगे या पाच पहिलांनी सहभाग घेतला. पावसाळ्याच्या दिवसात ओलसर वाटा, निसरडे दगड, चिखल आणि सतत बदलणारे हवामान यामुळे प्रवास अधिकच कठीण झाला होता. तरीही सर्वांनी परस्परांना दिलेले मानसिक बळ आणि उत्साहामुळे त्यांनी हे आव्हानात्मक शिखर सर केले.

शिखरावर पोहोचताच सर्वांनी तिरंगा फडकावला आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा देत परिसर दुमदुमून टाकला. या क्षणी प्रत्येकाच्या डोळ्यांत अभिमान आणि समाधान झळकत होते.मोहिमेचा अनुभव सांगताना सहभागी गिर्यारोहकांनी सांगितले की, चढाईदरम्यान थकवा, पावसाचा मारा आणि निसरडी वाट ही मोठी अडचण होती, मात्र एकमेकांच्या पाठबळामुळे हे यश शक्य झाले. कळसुबाई शिखर सर करणे हे प्रत्येक गिर्यारोहकाचे स्वप्न असते आणि ते जिल्ह्यातील या पाच जणींनी पूर्णत्वास नेले असल्याने परिसरात त्यांच्या यशाचे कौतुक होत आहे.

# देगलूर तालुक्यात अतिवृष्टीचा तडाखा : ६० टक्के खरीप पिकांचे नुकसान

देगलूर ।प्रतिनिधी

१७ ते १८ ऑगस्टदरम्यान झालेल्या अतिवृष्टीने देगलूर तालुक्यातील खरीप हंगामाची अक्षरशः वाट लावली आहे. कृषी विभागाने सादर केलेल्या प्राथमिक अहवालानुसार तब्बल ६० टक्के पिकांचे नुकसान झाले असून, मंगळवारपासून पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू झाली आहे. शेतकरी मात्र शासनाकडून मदतीच्या घोषणेची आतुरतेने वाट पाहत आहेत.

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नदी-नाले पुराने भरून वाहिले. शेतशिवार पाण्याखाली गेल्याने उभी पिके आडवी पडली; तर काही ठिकाणी पिके वाहून गेली. जमिनी खरडून गेल्याने उत्पादनावर मोठा परिणाम झाला आहे. विशेषतः नदीकाठच्या भागात नुकसानाचे प्रमाण जास्त असल्याचे दिसून येत आहे.

तालुक्यातील सात महसूल मंडळांत अतिवृष्टीची नोंद झाली असून, तूर, मूग, उडीद, सोयाबीन व कापूस या प्रमुख पिकांवर या पावसाचा फटका बसला आहे. रोगराईच्या साथीबरोबरच अतिवृष्टीच्या पाण्याने उभी पिके निकामी झाल्याने शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे.तालुक्यातील ६८,१२२ हेक्टर क्षेत्रापैकी ६०,९१४ हेक्टरवर खरीप पिकांची पेरणी झाली होती. मात्र, ३७,४६२ हेक्टर क्षेत्रावरील पिके बाधित झाल्याचे प्राथमिक आकडेवारीत नमूद करण्यात आले आहे. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर नुकसानाचे अचूक चित्र स्पष्ट होणार आहे.महागडी बियाणे खरेदी करून पेरणी केलेल्या शेतकऱ्यांचे स्वप्न अतिवृष्टीमुळे चूरचूर झाले आहे. आर्थिक संकटाच्या खाईत सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीच्या मदतीची गरज आहे, अशी मागणी गावागावांतून होत आहे.

# बैलांच्या दर्शन सोहळ्याला उत्साही प्रतिसाद नागनाथ मंदिराला महाभारतकालीन परंपरा, शेकडो वर्षांच्या इतिहासाची साक्ष

मानूर (प्रतिनिधी)

शिरूरकासार, तालुक्यातील मानूर गावातील प्रसिद्ध नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान येथे पोळ्याच्या दिवशी होणारा पारंपरिक व ऐतिहासिक सोहळा यंदाही मोठ्या उत्साहात पार पडला. शुक्रवारी (ता.२२) पंचक्रोशीसह मानूर गावातील शेतकरी आपल्या बैलांसह मंदिरात दाखल झाले. शतकानुशतकांपासून चालत आलेल्या परंपरेनुसार बैल मंदिराच्या उत्तरेकडील ऐतिहासिक अडीच फूट उंच दगडी दरवाजातून आत गेले, नागनाथ महाराजांचे दर्शन घेतले व सुखरूप बाहेर पडले. या सोहळ्यासाठी सकाळपासूनच भाविक व शेतकऱ्यांची मोठी गर्दी उसळली होती.

मानूर हे गाव आठ ते दहा हजार लोकसंख्या असलेले, मनकर्णा नदीच्या काठावर वसलेले असून आहिल्यानगरच्या सीमेवर आहे. या गावाला ऐतिहासिक महत्त्व लाभले आहे. महाभारतकालीन परंपरा असलेले हे ठिकाण आजही शेकडो वर्षांच्या इतिहासाची साक्ष देत आहे. गावात तटबंदीचे अवशेष,

दर्शनासाठी मोठी रांग

पोळ्याचा दिवस असल्याने मानूर गावासह पंचक्रोशीतील शेतकरी आपापल्या जोत्याच्या बैलांना सजवून मंदिरात घेऊन आले होते. सकाळपासूनच मंदिर परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले होते. दर्शनासाठी मोठी रांग लागली होती.

मानूर गाव व नागनाथ देवस्थानचे विशेष महत्त्व

या अनोख्या परंपरेमुळे मानूर गाव व नागनाथ देवस्थानाला वेगळेच महत्त्व वैशिष्ट्य प्राप्त झाले आहे. हजारो वर्षांपासून चालत आलेली ही परंपरा



आजही तग धरून आहे. पोळ्याच्या दिवशी बैलांचा दर्शन सोहळा पाहण्यासाठी लांबवरूनही भाविक येतात आणि दरवर्षीप्रमाणे यंदाही शेतकऱ्यांनी व भक्तांनी मोठ्या श्रद्धा व भक्तीभावाने या परंपरेत सहभाग नोंदवला.

इंग्रजकालीन पोलिस ठाण्याचे अस्तित्व आणि मठसंस्थानाला दिलेली जहागीरदार पदवी या सर्व गोष्टींमुळे मानूरचे विशेष स्थान आहे. मठाधिपती गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज यांच्या सांगण्यानुसार, संस्थानातील अनेक पूर्वीच्या महाराजांच्या समाधी येथे आहेत. संस्थानाचे भक्त महाराष्ट्रभर तसेच इतर राज्यांत पसरलेले असून, वर्षभर येथे भाविकांची ये-जा सुरूच असते. नागनाथ महाराजांचे मंदिर भव्यदिव्य असून मुख्य दरवाजा पूर्वेला आहे, तर उत्तर दिशेला

छोटासा अडीच फूट उंचीचा दगडी दरवाजा आहे. हा दरवाजचे महत्व पोळ्याच्या दिवशीच विशेष असते परंपरेनुसार शेतकरी आपल्या बैलांना सजवून येथे आणतात. आश्चर्य म्हणजे हा दरवाजा खूपच लहान असूनही मोठे बैल देखील आत जातात, दर्शन घेतात व सुखरूप बाहेर पडतात. अनेकदा बैल दरवाजात अडकला तरी नारळ फोडल्यावर व नागनाथ महाराज की जय अशा प्रकारे सहज बाहेर पडतो, अशी प्रचिती भाविकांना यंदाही आली..

# अंबाजोगाई शहरातील गुणवंतांचा राजकिशोर मोदी यांच्या कडून सन्मान



अंबाजोगाई (प्रतिनिधी):-अंबाजोगाई शहरातील डॉ विलास दत्ता जाधव याने छएएढ झक्रमध्ये भारतात १७४६ वा रँक तसेच ८०० पैकी ६१५ गुण मिळवत एमबीबीएस नंतरच्या झक्रसाठीच्या प्रवेशास पात्र ठरल्यामुळे तसेच कु. रूपाली शंकर पळसे हिने देखील छएएढ परीक्षा उत्तीर्ण होऊन स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश निश्चित केल्याबद्दल, त्याचबरोबर अंबाजोगाई शहरातील सुप्रसिद्ध व्यापारी निलेश मुथा यांची सुकन्या कु साक्षी हिने इऊड च्या पहिल्या राऊंडमध्येच नाशिक येथील डेंटल कॉलेजमध्ये आपला प्रवेश निश्चित केला आहे. याबद्दल या तीनही गुणवंतांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला.यावेळी राजकिशोर मोदी यांच्या सोबत शहरातील जेष्ठ नागरिक तसेच विविध चळवळीतील अग्रणी माणिकभाऊ कदम , दत्ता जाधव,निलेश मुथा सय्यद ताहेर, रशीद भाई, विजय कोंबडे , कु रुपालीची आई या उपस्थित होत्या.

या सन्मान सोहळ्या प्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सर्व गुणवंतांचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. अत्यंत बिकट व प्रतिकूल परिस्थितीतही कु रुपाली पळसे हिने अत्यंत जिद्दीने व चिकाटीने आपले शिक्षण घेतले . आज अंबाजोगाई शहरातीलच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या सा प्रवेशासाठी पात्र ठरल्याबद्दल कु रुपलीचे विशेष असे कौतुक केले शहरात सूप व दुरडी बनवण्याचा आपला पारंपरिक व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करणारे शंकर पळसे याची कन्या कु रुपाली ही अंबाजोगाई शहरातील बुरुड समाजातील पहिली डॉक्टर होण्याचा सन्मान मिळवणार आहे. त्याबद्दल संपूर्ण समाजातून देखील तिच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. चि विलास जाधव यांच्या कुटुंबात याअगोदर देखील डॉक्टर बनले आहेत. त्याने बी जे मेडिकल कॉलेज मधून आपले एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले आहे . त्यांच्या कुटुंबात डॉक्टर बनण्याची परंपरा पुढे डॉ विलास याने सुरू ठेवली आहे. मुथा कुटुंब हे अंबाजोगाई तालुक्यातील एक प्रतिष्ठित कुटुंब आहे. त्याची कन्या कु साक्षी हिने दंतवैद्यक शास्त्रात पहिल्या वर्षासाठी पहिल्याच फेरीत प्रवेशासाठी पात्र ठरली आहे. या कौतुक सोहळ्यात उपस्थित असलेले जेष्ठ नागरिक माणिक भाऊ कदम यांनी देखील या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या तिनही विद्यार्थ्यांनी आपल्या परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीने हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळं केवळ त्यांचे कुटुंबच नव्हे तर संपूर्ण परिसर व समाज अभिमानाने उंचावला असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी देखील घेऊन आपल्या कुटुंबासह संपूर्ण समाजाचे नाव उज्वल करावे असे आवाहन देखील इतर विद्यार्थ्यांना राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी केले आहे.



# उपनगरअध्यक्षापदी भास्कर शिरसकर यांचा ठिकठिकाणी सत्कार

पालम।प्रतिनिधी

पालम शहरातील व ग्रामीण भागातील सर्वांच्या अडीअडचणीला धावून जाणारे भास्करराव सिरस्कार यांची दि. २२ अगस्त रोजी बिनविरोध निवड झाल्यामुळे पालम शहरात व ग्रामीण भागात ठिकठिकाणी सत्कार करण्यात आला. महात्मा फुले यंत्रमाग सहकारी संस्थेचे चेअरमन वैजनाथराव हत्तीआंबीरे यांनी यंत्रमाग संस्थेच्या कार्यालयामध्ये शाल श्रीफळ देऊन, उपनगराध्यक्ष भास्कर सिरस्कार यांचा सत्कार केला. तसेच पेठ पिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते पंजाबराव शिंदे यांनी हार घालून हा शाल श्रीफळ छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला यावेळी. माजीं तालुकाध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी वसंतराव शिरसकर वैजनाथ हत्तीआंबीरे, पंजाबराव शिंदे, सखाराम हत्तीआंबीरे, ताहेरखान पठाण, भैय्या शिरसकर, चाऊस भाई शंतनू आव्हाड, मारोती नाईकवाडे, राहुल गायकवाड, शांतीलाल शर्मा, अगदी जणांनी उपस्थित राहून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

# घनसावंगी तालुका खरेदी विक्री संघाच्या सभापतीपदी राष्ट्रवादीचे दत्तात्रय तौर यांची बिनविरोध निवड



घनसावंगी ।प्रतिनिधी

घनसावंगी तालुका खरेदी विक्री संघाच्या सभापतीपदी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दत्तात्रय दशरथराव तौर यांची सभापतीपदी बिनविरोध निवड करण्यात आली. घनसावंगी तालुका खरेदी विक्री संघाच्या संचालक मंडळाच्या निवडणुकीमध्ये १७ पैकी १७ सदस्य माजीमंत्री राजेश टोपे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी कॉग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बिनविरोध निवडून आल्यानंतर सभापतीपदाच्या निवडीची औपचारिकता संपन्न झाली. निवडणुक निर्णय आधिकारी म्हणून सहायक निबंधक आधिकारी श्री.नविनकुमार सातपुते यांनी काम पाहिले. संचालक मंडळामध्ये दिपक मरकड,रामभाऊ बोबडे,गुलाबराव चव्हाण,सुशील तौर,युवराज आर्दड, सौ.शारदा ज्ञानोबा साबळे,सौ.सरोज सुशील तांगडे,दत्तात्रय आर्दड,सिध्देश्वर शिंदे,हनुमंत मोरे,संतोष मुळे,सौ.अनुराधा राजेंद्र कोल्हे,सौ.पद्माबाई नेताजी देशमुख,सुभाषराव वाव्हळे,भगवानराव गायकवाड,सौ.संजीवनी भास्कर गाढवे यांनी मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग घेतला. नवनिर्वाचित सभापती व संचालक मंडळांच्या बिनविरोध निवडीचे कार्यकर्त्यांनी फटाके फोडून आनंद साजरा केला.

# दिव्यांग विद्यार्थ्यांना लेखनिक देणे सक्तीचे, दिव्यांग मंत्रालयाचा निर्णय - राजेंद्र लाड

आष्टी (प्रतिनिधी)

दिव्यांग उमेदवारांना परीक्षा देण्यासाठी होणारा त्रास कमी करण्याच्या उद्देशाने हे निर्देश दिले आहेत. परीक्षा केंद्र शक्यतो तळमजल्यावर ठेवण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. प्रामुख्याने लिहिण्यास अडथळा असलेल्या किंवा लिहिण्याची गती कमी असलेल्या दिव्यांग उमेदवारांना लेखनिक अथवा सहायक देण्यात येईल. अशी माहिती दिव्यांग हितार्थ शासन मान्य महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड यांनी दिली आहे.

राज्यातील स्पर्धा परीक्षांमध्ये दिव्यांग उमेदवारांना सोयीसुविधा नाकारल्याच्या तक्रारींना गांभीर्याने घेत, राज्याच्या दिव्यांग कल्याण विभागाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. नवीन सुधारित मार्गदर्शक सूचनांनुसार, कोणत्याही दिव्यांग उमेदवाराने मागणी केल्यास संबंधित परीक्षा यंत्रणेला लेखनिक, वाचक किंवा प्रयोगशाळा सहायक उपलब्ध करून देणे आता बंधनकारक राहील.



दिव्यांग उमेदवारांना परीक्षा देण्यासाठी होणारा त्रास कमी करण्याच्या उद्देशाने हे निर्देश दिले आहेत. परीक्षा केंद्र शक्यतो तळमजल्यावर ठेवण्याचे स्पष्ट निर्देश आहेत. प्रामुख्याने लिहिण्यास अडथळा असलेल्या किंवा लिहिण्याची गती कमी असलेल्या दिव्यांग उमेदवारांना लेखनिक अथवा सहायक देण्यात येईल. नवीन आदेशानुसार, उमेदवार स्वतःचा लेखनिक आणू शकतो किंवा परीक्षा आयोजक त्याची व्यवस्था करतील. लेखनिकाची शैक्षणिक पात्रता उमेदवाराच्या पात्रतेपेक्षा कमी असावी, जेणेकरून निष्पक्षता राखली जाईल. तसेच अतिरिक्त वेळही मिळेल.परीक्षा केंद्रांवर दिव्यांगांसाठी रॅम्प, व्हीलचेअर, पिण्याचे पाणी, स्वच्छ शौचालय आणि सहायक कर्मचारी उपलब्ध ठेवणे आवश्यक आहे. प्रवेशद्वाराजवळ बसण्याची सोय करण्याचाही आदेश देण्यात आला आहे. दृष्टिहीन, न्यूनदृष्टी, शारीरिक हालचालींमध्ये अडचण असलेले, सेरेब्रल पाल्सी, डिस्लेक्सिया आणि ऑटिझम ग्रस्त उमेदवारांना या सुविधांना प्राधान्य दिले जाणार आहे. लेखनिकाची मदत घेतल्यास, उत्तरपत्रिकेवर त्याचे नाव व स्वाक्षरी नमूद करणे बंधनकारक आहे. दरम्यान, दिव्यांगत्व असलेल्या परीक्षार्थ्यांना लेखनिक वा सहायक मिळवण्यासाठी वेगळे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही, असेही आदेशात स्पष्ट आहे असे शेवटी राजेंद्र लाड यांनी सांगितले आहे.

# अवैध दारू विक्री विरोधात तक्रार केल्यानेच पोलिसांनी सूडबुद्धीने प्रतिबंधात्मक कारवाई केली – शिवलिंग बोधने

परभणी ।प्रतिनिधी

तालुक्यातील शिंगणापूर येथील महिला मागील अनेक दिवसापासून गावातील अवैध दारू विक्रीच्या विरोधात पोलिसांकडे लेखी तक्रार करत आहे परंतु त्या तक्रारीची दखल घेतली जात नाही म्हणून त्या महिलांनी प्रहार जनशक्ती पक्षाच्या माध्यमातून जिल्हा पोलीस अधीक्षकांकडे तक्रार केली त्यावेळी ग्रामीणचे डीवायएसपी श्री देशमुख साहेब हे तक्रारदार महिलांशी ज्यात शिंगणापूर गावच्या महिला सरपंच व महिला पोलीस पाटील यांच्यासह ४० ते ५० महिला होत्या त्यांच्याशी चुकीच्या पद्धतीची वागणूक दिली.

तक्रारदार महिलांना पोलीस अधिकाऱ्यांकडून जी चुकीची वागणूक मिळाली ती तक्रारदार महिलांनी व प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने यांनी मीडियासमोर सांगितली व त्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

महिलांनी तक्रार केल्यानंतर पोलिसांच्या वतीने शिंगणापूर गावातील अवैध दारू विक्री करणाऱ्या लोकांवर कारवाई होणं अपेक्षित होतं परंतु अवैध दारू विक्री च्या विरोधातील शिंगणापूर येथील महिलांची साथ देऊन त्यांच्या वतीने प्रहार जनशक्ती पक्षाने जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे जी तक्रार दाखल केली व याबद्दलच्या बातम्या वर्तमानपत्रात छापून आल्या त्यातूनच काल दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी शेतकऱ्यांचा सर्वात महत्त्वाच्या बैलपोळा सणाच्या दिवशीच प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई पोलिसांच्या वतीने करण्यात आली. यासाठी शेतकरी कर्जमाफीच्या आंदोलनामध्ये जे आंदोलनाचे तीन गुन्हे दाखल झाले त्यांचा आधार देण्यात आला. मुळात या तिन्ही गुन्ह्यामध्ये कुठल्याही प्रकारचे हिंसक कृत्य, मालमत्तेचे नुकसान किंवा समाजामध्ये तेढ निर्माण करण्याचे काम प्रहार जनशक्ती पक्षाकडून करण्यात आलेलं नाही हे केवळ आंदोलन स्वरूपातील राजकीय गुन्हे आहेत तरीही या गुन्ह्यांचा आधार घेऊन सगळेच गुन्हेगारांवर जशी कारवाई करण्यात येते तशी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली दुपारी दोन ते संध्याकाळी सात पर्यंत ही संपूर्ण कारवाई नवा मोंढा पोलीस स्टेशन व अप्पर पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात करण्यात आली.

अवैध दारू विक्री व्यवसाय विरोधात शिंगणापूर येथील महिलांची साथ देऊन प्रहार जनशक्ती पक्षाने पोलिसांकडे जी तक्रार दिली व पोलिसांकडून मिळालेल्या चुकीच्या वागणुकीच्या खऱ्या बातम्या मीडियामध्ये सांगितल्या याचमुळे माझ्यावर ही प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असा आरोप प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शिवलिंग बोधने यांनी केला तसेच अवैद्य दारू विक्री विरोधातील हे आंदोलन असेच चालू राहील असेही त्यांनी सांगितले.



छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी

दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी गव्हर्नमेंट कॉलेज ऑफ फार्मसी छत्रपती संभाजीनगर येथे भारत सरकारच्या भारतीय प्रतिभूती व विनिमय बोर्ड अर्थात (सेबी) तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज(एन. एस.इ.) च्यामाध्यमातून फार्मसी कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी एक दिवसीय स्मार्ट निवेशक जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. पी. बी.श्यामकुंवर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून(सेबी) तसेच एन.एस.इ.चे सेक्युरिटीज मार्केट ट्रेनर श्री.गणेश चौधरी सर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजनाचे मार्गदर्शन केले.यात त्यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीयकृत बँकेत तसेच पोस्ट ऑफिसमध्ये असलेल्या विविध योजना,डिमॅट अकाउंट,शेअर मार्केट, म्युच्युअल फंड व इतर शासकीय योजनांचे मार्गदर्शन केले.तसेच गुंतवणूक करत असताना विद्यार्थ्यांनी काय काळजी घ्यावी व फसवणूक करणाऱ्या योजनांपासून सावध राहण्याच्या सूचना दिल्या.हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ.मयुरा काळे मॅडम यांनी विशेष परिश्रम घेत कार्यक्रमाचे आयोजन,नियोजन तसेच सूत्र संचालन केले.या कार्यक्रमास फार्मसी कॉलेजचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पंडित जवाहरलाल नेहरू ज्युनिअर कॉलेज आष्टी च्या नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन समारंभ व पालक मेळावा

आष्टी (प्रतिनिधी)

स. न. वि. वि. कळविण्यास आनंद होत आहे की, शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित, पंडित जवाहरलाल नेहरू ज्युनिअर कॉलेज, आष्टी च्या नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन समारंभ व पालक मेळावा सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वा. या शुभमुहूर्तावर करण्याचे योजिले आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन समारंभ मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब (संस्थापक अध्यक्ष) यांच्या शुभहस्ते होणार असून यावेळी प्रमुख उपस्थिती डॉ. अजयदादा धोंडे (सहसचिव शे. शि. प्र. मंडळ आष्टी तथा राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य, डॉ. बा. आ. म. वि. छ. संभाजीनगर) अभयराजे धोंडे (कोषाध्यक्ष आनंद चॅरिटेबल संस्था, आष्टी), श्रीमती सीमा काळे मॅडम (गटशिक्षणाधिकारी पं. स. आष्टी), मोहन काकडे साहेब (शिक्षणविस्तार अधिकारी पं. स. आष्टी), त्रिंबकराव दिंडे साहेब (केंद्रप्रमुख) व सर्व प्रशासकीय अधिकारी शे. शि. प्र. मंडळ आष्टी, प्राचार्य व सर्व स्टाफ भगवान महाविद्यालय, प्राचार्य व सर्व स्टाफ बी. एड्. महाविद्यालय, प्राचार्य व सर्व स्टाफ बी. पी. एड्. महाविद्यालय यांची असणार आहे.

तरी शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी संचलित, पंडित जवाहरलाल नेहरू ज्युनिअर कॉलेज, आष्टी च्या नूतन इमारतीचा भव्य उद्घाटन समारंभ व पालक मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन प्राचार्य बोडखे एस. जी., उपप्राचार्य भवर एस. जी. व सर्व स्टाफ पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, आष्टी यांनी केले आहे.



# ब्रह्माकुमारीजचे रक्तदान महाअभियान, एक लाख युनिट्ससह गिनीज वर्ल्ड रेकॉर्डचा संकल्प

## रक्तदान महाअभियानात सहभागी होण्याचे – ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांचे आवाहन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

ब्रह्माकुमारीज संस्थेतर्फे सुरू करण्यात आलेल्या रक्तदान महाअभियानाचा राष्ट्रीय शुभारंभ केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी.नड्डा यांच्या हस्ते नुकताच नवी दिल्ली येथे झाला. या अभियानांतर्गत भारत व नेपाळातील ६००० हून अधिक सेवा केंद्रांवर २२ ते २५ ऑगस्ट २०२५ दरम्यान रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, एक लाख युनिट रक्तदान करण्याचा संकल्प आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अंबाजोगाई येथील स्थानिक सेवा केंद्रामार्फत रक्तदान शिबिराचे आयोजन सोमवार, दि.२५ ऑगस्ट, २०२५ सोमवार रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आनंद सरोवर, वाघाळा रोड, अंबाजोगाई येथे करण्यात आले आहे. रक्तदान महाअभियानात सहभागी होण्याचे आवाहन अंबाजोगाई सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी केले आहे.

या रक्तदान महाअभियानाबाबत अधिक माहिती देताना अंबाजोगाई सेवा केंद्र संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी सांगितले आहे की, रक्तदान महाअभियान ही ऐतिहासिक मोहीम संस्थेच्या माजी मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी प्रकाशमणी यांच्या १८ व्या पुण्यतिथी व 'विश्वबंधुत्व दिन' या निमित्ताने राबवली जात असून, गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद होण्याची अपेक्षा आहे. ब्रह्माकुमारीजच्या समाज सेवा प्रभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या या महाअभियानासाठी भारत सरकारचे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, विविध रक्तपेढ्या, जिल्हा सरकारी रुग्णालय, वैद्यकीय महाविद्यालय, रोटरी इंटरनॅशनल क्लब, लायन्स क्लब, आय.एस.बी.टी.आय, सर्व महाविद्यालय, एन.सी.सी व सर्व स्थानिक समाज मंडळे, सामाजिक संस्था यांच्या सहकार्याने स्थानिक पातळीवर रक्तदान शिबिरे घेतली जातील. ज्या सेवा केंद्रांवर रक्तदान शिबिरे आयोजित केली जातील, त्यांची मॉनिटरिंग गुगल मॅपद्वारे केली जाईल. यासाठी एक गुगल फॉर्म तयार करण्यात आला आहे, ज्यामध्ये रक्तदानाचे ठिकाण, वेळ, दिनांक, गुगल मॅप, रक्तदात्यांची संख्या, सेवा केंद्र प्रमुखाचे नांव, सहयोगी संस्थांची नांवे आदी संपूर्ण माहिती भरली जात आहे, जेणेकरून रक्तदान महाअभियानानंतर डेटा संकलन सुलभ होईल. महाराष्ट्रातही विविध सेवाकेंद्रामार्फत भव्य रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अंबाजोगाई येथील स्थानिक सेवा केंद्रामार्फत रक्तदान कार्यक्रम सोमवार, दि.२५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत आनंद सरोवर, वाघाळा रोड, अंबाजोगाई येथे राबविण्यात येणार असल्याचे अंबाजोगाई सेवा केंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी सुनिता दीदी यांनी सांगितले आहे. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या रक्तदात्यांना ऑनलाईन रजिस्ट्रेशन करण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्याची लिंक हींींि://िंळपूीश्र.ले/ 'रिज्ञींरवरप-ालक्ष अशी असून 'क्युआर कोड' ची सुविधा उपलब्ध असून ती शहरात मुख्य चौकात लावलेल्या बॅनरवर उपलब्ध आहे. तसेच ज्यांनी पुर्व नोंदणी केली नाही. अशा व्यक्तींना ही रक्तदान शिबिराचे ठिकाणी उपस्थित राहून व सहभागी होवून त्यांच्या नांवाची नोंदणी त्या ठिकाणी करता येणार आहे.

# नगरमध्ये मध्यरात्री चोरट्यांचा धुडगूस; प्राणघातक हल्ला करत ऐवज लांबविला

अहिल्यानगर / प्रशांत बाफना

नगर तालुका पोलीस ठाण्याच्या हद्दीतील निमगाव वाघा येथे शुक्रवारी मध्यरात्री अनिल मारुती गुंजाळ यांच्या घरात चार अज्ञात चोरट्यांनी घुसून प्राणघातक हत्याराने हल्ला करत १ लाख ३ हजार रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने लुटले. या घटनेत गुंजाळ यांच्यासह शेजारी हरीभाऊ देवराम जाधव यांनाही मारहाण करून जखमी करण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी दाखल झाले असून, गुन्हा दाखल करून तपास सुरू आहे. अनिल गुंजाळ (वय ४२, रा. निमवाघा वाघा) हे कुटुंबासह घरी झोपले असताना चोरट्यांनी लाकडी दांडके आणि धारदार हत्यारासह घरात प्रवेश केला. त्यांनी गुंजाळ यांना आणि कुटुंबियांना मारहाण करून ७० हजारांचे सोन्याचे मंगळसूत्र, २५ हजारांचे सोन्याचे झुबे, ३ हजारांचा सोन्याचा डाग आणि ५ हजारांच्या चांदीच्या अंगठ्या असा ऐवज बळजबरीने हिसकावला.गुंजाळ यांच्या ओरडण्याचा आवाज ऐकून मदतीसाठी धावलेले शेजारी हरीभाऊ जाधव यांच्यावरही चोरट्यांनी हल्ला केला. त्यांच्या डोक्यावर, मानेवर आणि शरीरावर प्राणघातक हत्याराने वार करून जखमी केले

# जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर

डॉ आशिष तिवारी/जालना

राज्य शासनाच्या ग्रामविकास विभागाच्या आदेशानुसार जालना जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी अंतिम प्रभाग रचना जाहीर करण्यात आली आहे.दि. २२ ऑगस्ट २०२५ रोजी शासन राजपत्रात प्रकाशित झालेल्या अधिसूचनेनुसार जिल्ह्यातील एकूण ५७ जिल्हा परिषद व १४४ पंचायत समिती सदस्य स्थानांसाठी प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत. यामध्ये जाफराबाद-१२, भोकरदन-२२, बदनापूर-१०, जालना-१८, मंठा-१२, परतूर-१०, घनसावंगी-१४ व अंबड-१६ अशा प्रभागांचा समावेश आहे.जालना जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, सर्व उपविभागीय कार्यालये, तहसील कार्यालये तसेच पंचायत समिती कार्यालयांत अंतिम प्रभाग रचनेची प्रत नागरिकांच्या अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे.सर्व संबंधितांनी अंतिम प्रभाग रचना तपासून घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केले आहे.



# गणेश उत्सव व ईद-ए-मिलाद सणाच्या अनुषंगाने पोलीस ठाणे अंबडच्या वतीने

# शांतता समिती ची बैठक एसीपी अजयकुमार बन्सल ,आ.नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

गणेशोत्सव आणि ईद-ए-मिलाद या दोन महत्वाच्या सणांच्या पार्श्वभूमीवर अंबड तहसील कार्यालयात पोलीस ठाणे अंबडच्या वतीने शांतता समितीची बैठक तहसील कार्यालयाच्या मीटिंग हॉलमध्ये जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मा.अजय कुमार बंसल, आमदार नारायण कुचे यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाली. या बैठकीस जिल्हा पोलीस अधीक्षक मा. अजय कुमार बंसल, आ. नारायण कुचे, उपविभागीय अधिकारी मा.उमाकांत पारधी, तहसीलदार मा .विजय चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी मा .विशाल खांबे, पोलीस निरीक्षक मा. संतोष घोडके,नगर परिषद मुख्याधिकारी मा .मनोज उर्कीडे, वैद्यकीय अधीक्षक मा.डॉ. सुरमवाड, गटविकास अधिकारी मा.श्रीमती कवडादेवी मॅडम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता फेरोज शेख यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, गणेश मंडळांचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीत शहरातील शांतता, सुव्यवस्था व सण साजरे करताना येणाऱ्या अडचणींवर चर्चा झाली. अंबड शहरातील सामंजस्यपूर्ण सामाजिक वातावरणाचे कौतुक करताना हाजी अब्दुल समद बागवान आणि अजीम पाशा यांनी सांगितले की, अंबड शहराची खासियत म्हणजे कोणताही सण हिंदू वा मुस्लिम समाजाचा असो, सर्व समाजातील नागरिक एकत्र येऊन सण साजरे करतात. खरा तो एकच धर्म - जगाला प्रेम अर्पावे हे साने गुरुजींचे तत्त्व इथे खऱ्या अर्थाने पाहायला मिळते, असे अजीम पाशा यांनी नमूद केले.



**डीजेवर बंदी - पोलीस अधीक्षक बंसल यांचा स्पष्ट आदेश**

जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानुसार डीजे आणि लेझर लाईट यांना परवानगी नाही. त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. लहान मुले, वृद्ध आणि महिलांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे सर्वांनी कायद्याचे पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**रस्त्यांवरील खड्डे आणि लाईटच्या समस्यांवर तत्काळ उपायाचे आश्वासन**

गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी शहरातील खड्डे, लाईटच्या तारा लोंबकळणे, सतत जाणारी वीज या अडचणी मांडल्या. यावर नगर परिषदचे मुख्याधिकारी मनोज उर्कीडे यांनी खड्डे आणि रस्त्यांवरील पाणी त्वरित दूर करून रस्ते सुरळीत करण्याचे आश्वासन दिले. मात्र महावितरण आणि सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी बैठकीस गैरहजर राहिल्याने आमदार नारायण कुचे यांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून झापले. लोकांच्या आस्थेचा विषय असताना अधिकाऱ्यांची अनुपस्थिती निंदनीय आहे, असे ते म्हणाले.

**महिला सुरक्षेचा मुद्दा ठरला केंद्रस्थानी**

बैठकीतील सर्वाधिक चर्चिला गेलेला मुद्दा म्हणजे शाळा व कॉलेजला जाणाऱ्या मुलींना त्रास देणाऱ्या 'रोड रोमिओ' विरुद्धची कारवाई. या संदर्भात नागरिकांनी जोरदार मागणी केली. यावर आमदार नारायण कुचे यांनी स्पष्ट शब्दांत पोलीस प्रशासनाला निर्देश दिले की, अशा टवाळखोरांवर केवळ गुन्हे दाखल करून उपयोग नाही, ते एका तासात बाहेर येतात. त्यांना थेट चोप द्या, कठोर कारवाई करा.

सस्नेह निमंत्रण

श्रीमान

अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने देण्यात येणारा मानाचा
नागोजीराव दुधगावकर स्मृती पुरस्कार
प्राप्त जेष्ठ संपादक
मा.श्री.सर्वोत्तम गावरस्कर (आण्णा) यांचा
भव्य नागरी सत्कार
रविवार, दि.२४/०८/२०२५, सकाळी ११.३० वा. आयोजित करण्यात आला आहे,
तरी सर्वोत्तम अण्णा गावरस्कर प्रेमींनी उपस्थित रहावे, ही विनंती.

• शुभहस्ते •
पद्मश्री मा.श्री.डॉ. तात्यासाहेब लहाने

• प्रमुख पाहुणे •
मा.श्री.जयदत्तजी क्षीरसागर
(माजी मंत्री, महाराष्ट्र राज्य)
व सर्व सन्माननीय संपादक बीड जिल्हा

• कार्यक्रमाचे अध्यक्ष •
मा.श्री.एस.एम. देशमुख
मुख्य विश्वस्त मराठी पत्रकार परिषद,मुंबई.

• आपले विनीत •

दिलीप खिस्ती (माजी विभागीय,सचिव)
रवी उबाळे (विभागीय,सचिव)
सुभाष चौरे (विभागीय समन्वयक)
विलास डोळसे (राज्य कार्यकरिणी सदस्य)
विशाल साळुंके (जिल्हाध्यक्ष)
गजानन मुडेगावकर (जि.कार्याध्यक्ष)
सुभाष सुतार (जिल्हा सरचिटणीस)
धनंजय अरबुने (जि.कार्याध्यक्ष)
संजय हांगे (जि.प्रसिध्दी प्रमुख)
दत्ता अंबेकर (जिल्हा निमंत्रक)
अभिमन्यू घरत (जिल्हा समन्वयक)
चंद्रकांत राजहंस (जिल्हा उपाध्यक्ष)
सचिन पवार (जिल्हा उपाध्यक्ष)
अविनाश कदम (जिल्हा उपाध्यक्ष)
जुनेद बागवान (जिल्हा उपाध्यक्ष)
दिलीप झगडे (जिल्हा उपाध्यक्ष)
संजय रानभरे (जिल्हा उपाध्यक्ष)
गौतम बचुटे (जिल्हा उपाध्यक्ष)
कादर मकराणी (जिल्हा उपाध्यक्ष)
दत्ता आजबे (तालुकाध्यक्ष)
मधुकर तौर (तालुकाध्यक्ष)
जालिंदर नन्नवरे (तालुकाध्यक्ष)
अजय जोशी (तालुकाध्यक्ष)
हरीष यादव (तालुकाध्यक्ष)
विजय अरकडे (तालुकाध्यक्ष)
सतिष सोनवणे (तालुकाध्यक्ष)
प्रशांत लाटकर (तालुकाध्यक्ष)

मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा

पत्रिका प्रिंट्स,बीड/9420253038

स्थळ : हॉटेल अन्विता, जालना रोड,बीड